जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# सणासुदीच्या काळात सामूहिक अन्नवाटपासाठी पूर्वपरवानगी आवश्यक

नगर – सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सामूहिक अन्नवाटप, महाप्रसाद, भंडारा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा सामूहिक अन्नवाटपासाठी अन्न औषध प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी आयोजकांनी अन्न औषध प्रशासनाच्या http://festivals.mahafda.in या ऑनलाइन पोर्टलवर विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

महाप्रसाद, भंडारा तसेच इतर कोणत्याही स्वरूपात मोफत अन्नप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्यास संबंधित आयोजकांनी कार्यक्रमाच्या किमान ७ दिवस आधी आवश्यक माहिती भरून ऑनलाइन पोर्टलद्वारे अन्न औषध प्रशासनाकडे परवानगी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळे, नवरात्रोत्सव मंडळे तसेच विविध सण–उत्सवानिमित्त सामूहिक अन्नवाटपाचे आयोजन करणाऱ्या संस्था व आयोजकांनी विहित मुदतीत अन्न औषध प्रशासनाकडे ऑनलाइन अर्ज दाखल करून पूर्वपरवानगी प्राप्त करावी. पूर्वपरवानगी घेतल्यानंतरच अन्नवाटपाचे आयोजन करावे, असे आवाहन अन्न औषध प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मतदार नोंदणीसाठी १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष शिबीर

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम–२०२६ अंतर्गत मतदार यादी अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत नागरिकांना नवीन मतदार म्हणून नोंदणी करणे, मतदार यादीतील विद्यमान नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच नाव वगळणीसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याकरीता नमुना ६, ७ व ८ पुरेशा प्रमाणात स्थानिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

या अनुषंगाने राज्यातील सर्व मतदान केंद्रांवर १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या दिवशी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नियुक्त मतदान केंद्रांवर उपस्थित राहतील.

विशेष शिबिरांमध्ये नागरिकांना पुढील सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. पात्र नागरिकांची नवीन मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी अर्ज स्वीकारणे. मतदार यादीतील विद्यमान नोंदींमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी अर्ज स्वीकारणे. मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी अर्ज स्वीकारणे. पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे. शिबिरांमध्ये महिला तसेच दिव्यांग नागरिकांच्या समावेशकतेसाठी विशेष प्राधान्य देणे.

राज्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचा कालावधी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांनी नवीन मतदार नोंदणी तसेच मतदार यादीतील नोंदींची दुरुस्ती व नाव वगळणीसाठी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा. तसेच १ ऑक्टोबर रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा पात्र तरुण नागरिकांनी विशेष शिबिरांचा लाभ घेऊन मतदार म्हणून नोंदणी करावी.

नवीन पात्र मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी यासाठी जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्येही विशेष शिबिरे आयोजित करून जनजागृती व नोंदणीची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपल्या नावाची मतदार यादीतील नोंद तपासून, आवश्यक असल्यास संबंधित अर्ज भरून द्यावा. पात्र एकही नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी केले आहे.

# पैशांच्या देवाणघेवाणीवरून तरुणावर जीवघेणा हल्ला

## नगरसेवकासह पाच जणांवर गुन्हा दाखल

नगर – पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून नगरसेवकाने आपल्या साथीदारांसह एका तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी जखमी रोहित सुरेश पाथरकर (वय २६, रा.लिंकरोड, केडगाव) यांच्या जबाबावरून नगरसेवक सागर राजु मुर्तडकर, सनी मुर्तडकर, आकाश मुर्तडकर, शिवम शिंगटे (सर्व रा. वंजारगल्ली, मंगलगेट) आणि गणेश सुंबे (रा.भुतकरवाडी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी हे व्यवसायाच्या निमित्ताने मंगलगेट परिसरात नेहमी जात असतात. यादरम्यान १४ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास नगर–पुणे रोडवरील राजश्री हॉटेलसमोर आर्थिक व्यवहाराचे पैसे घेण्यासाठी फिर्यादी व त्यांचा मित्र आले होते. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर फिर्यादी घरी जात असताना, नगरसेवक सागर मुर्तडकर हा तिथे आला व जुन्या कारणावरून वाद घालून शिवीगाळ करू लागला. वाद वाढल्यानंतर आरोपींनी फिर्यादीला धक्काबुक्की केली. त्यानंतर सोबत आणलेल्या लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डाव्या पायावर मारहाण करण्यात आली. तसेच खाली पाडून गळा दाबण्याचा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी जखमी तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याच्या जबाबावरून पोलिसांनी १६ सप्टेंबर रोजी आरोपींवर गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# बोल्हेगाव परिसरात कपड्याच्या दुकानामागच्या वॉशरुममध्ये महिलेवर अत्याचार, आरोपी पसार

नगर – अहिल्यानगर शहरातील बोल्हेगाव परिसरातील स्वामी विवेकानंद कॉम्प्लेक्सजवळ एका कपड्याच्या दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या वॉशरुममध्ये बळजबरीने घुसुन एका विवाहित महिलेचे तोंड दाबून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शेजारील गाळा मालकाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, बोल्हेगाव येथील स्वामी विवेकानंद कॉम्प्लेक्समध्ये एका महिलेचे कपड्याचे दुकान आहे. १५ सप्टेंबर रोजी रात्री पावणे नऊच्या सुमारास सदर महिला तिच्या दुकानाजवळ असलेल्या महिला वॉशरुममध्ये गेली होती. ती आत जाऊन दरवाजा लावत असतानाच, तिच्याच दुकानाशेजारी गाळा असलेला मालक देविदास खराद हा अचानक तिथे आला. त्याने बळजबरीने वॉशरुमचा दरवाजा ढकलून आत प्रवेश केला आणि आतमधून कडी लावून घेतली. आरोपी देविदास खराद याने आतमध्ये शिरून संबंधित महिलेचे तोंड दाबले आणि तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने अमानुष कृत्य केले. या घटनेमुळे पीडित महिला पूर्णपणे घाबरली होती. दरम्यान, काही वेळाने संबंधित महिलेचे पती आणि दिर तिथे आले. त्यांना काहीतरी संशयास्पद वाटल्याने त्यांनी तातडीने वॉशरुमचा दरवाजा ठोठावला आणि तोडून टाकला.

दरवाजा तुटल्याचे पाहताच आरोपी देविदास खराद याने तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. महिलेच्या पती आणि दिराने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता, तो हाताला झटका देऊन घटनास्थळावरून पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच पीडित महिलेने आपल्या कुटुंबातील सदस्यांसह पोलीस ठाण्यात येऊन घडलेल्या प्रकाराची फिर्याद दिली. पोलिसांनी फिर्यादीनुसार आरोपी देविदास खराद याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बडीसाजन व बोथरा परिवाराच्या 'पारस नवजीवन घरकुल योजना' या मोफत भव्य पाच मजली इमारतीचा १९ सप्टेंबर रोजी 'लोकार्पण सोहळा'



नगर – समाजातील निवारा नसलेल्या परिवारांना हक्काचा निवारा मिळावा, या सेवाभावी भावनेतून नगरच्या श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघ आणि बोथरा परिवाराच्या संपूर्ण सहकार्याने साकारण्यात आलेली 'पारस नवजीवन घरकुल योजना' आता पूर्णत्वास आली आहे. केडगाव येथील श्री रेणुकामाता मंदिराजवळ उभारण्यात आलेल्या या पाच मजली इमारतीचा लोकार्पण १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. नागपूर येथील पगारिया ग्रुपचे चेअरमन उज्वल पगारिया यांच्या अध्यक्षतेखाली हा लोकार्पण सोहळा होणार आहे. पुणे येथील एस.एस.डी. रूणवाल ग्रुपचे चेअरमन सतीश रुणवाल, मनमाड–चांदवड येथील एस.एन.जे.बी. नॉलेज सिटीचे चेअरमन अजित सुराणा तसेच श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या हस्ते या घरकुल योजनेचे लोकार्पण करण्यात येणार आहे. यावेळी संतोष बोथरा, सतीश बोथरा यांच्यासह परिवारातील सदस्य तसेच श्रीसंघाचे पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाचे उपाध्यक्ष अजित कर्नावट यांनी दिली.

पेमराज बोथरा म्हणाले, समाजातील ज्या बंधू भगिनींना स्वतःचे हक्काचे घर नाही अशा गरजू कुटुंबीयांना मोफत घरकुले देण्याची माझे वडील स्व.मानकचंद बोथरा व स्व.विलास लोढा यांची इच्छा होती. आज ही घरकुल योजना पूर्णत्वास आल्याने श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे. याचा मला अभिमान व आनंद मला वाटत आहे.

'पारस नवजीवन घरकुल योजना' या प्रकल्पाची अधिक माहिती देताना संस्थेचे सचिव विशाल शेटिया यांनी सांगितले, अहिल्यानगरच्या बोथरा परिवाराच्या संपूर्ण सहकार्यातून या प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामास जून २०२३ मध्ये सुरवात झाली. दोन वर्षांत या ५ मजली सर्व सोयीसुविधांयुक्त अद्ययावत इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास आले आहे. याठिकाणी समाजातील निवारा नसलेल्या ३० गरजू परिवारांना घरे देण्यात आली आहेत. या घरकुल प्रकल्पासाठी पारस उद्योग समूहाच्या बोथरा परिवाराच्या वतीने केडगाव येथे मोफत जागा देण्याबरोबरच संपूर्ण बांधकाम खर्चही बोथरा परिवाराच्या वतीनेच करण्यात आला आहे.

या लोकार्पण सोहळ्यानिमित्त १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता दौंड रोड वरील बडीसाजनच्या सॉलिटेयर कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे खजिनदार मिलिंद जांगडा यांनी दिली.

# गुरुमुखदास खुबचंदानी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सिंधी कॉलनी, तारकपूर येथील रहिवासी गुरुमुखदास मोतीराम खुबचंदानी (वय ९३) यांचे १७ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे विद्युतदाहिनीत १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ८.३० वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत.

त्यांच्या मागे ५ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कुणाल प्रिंटर्सचे किशोर खुबचंदानी याचे ते वडील होत.

## सेवानिवृत्त शिक्षणविस्तार अधिकारी दत्तात्रय झरेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त शिक्षणविस्तार अधिकारी दत्तात्रय सबाजी झरेकर यांचे ११ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील प्रा. अविनाश झरेकर यांचे ते वडील होत.

श्री. झरेकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षण विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासासाठी विशेषकरुन नगर व पारनेर तालुक्यात उल्लेखनीय योगदान दिले. शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्राशी निगडित विविध घटकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपत आपली प्रशासकीय जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने पार पाडली. त्यांच्या कार्यपद्धतीत शिस्त, पारदर्शकता आणि माणुसकीचा सुंदर समन्वय होता.

# 'समान काम, समान वेतना'च्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्याफिती आंदोलन

**वेतनवाढीचा प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित; बेमुदत संपाचा इशारा; १६ व १७ ऑक्टोबरला पुन्हा काळ्याफिती, ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा; १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा**



'समान काम, समान वेतना'च्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून आंदोलन केले. (छाया – लहू दळवी)

नगर – समान काम, समान वेतनाच्या मागणीसह न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे दीर्घकाळ प्रलंबित असल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने आंदोलनाचा पहिला टप्पा सुरु करण्यात आला. या आंदोलनांतर्गत अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून दिवसभर कामकाज केले.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन वेतनवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे.

यावेळी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, उपाध्यक्ष रवींद्र सूर्यपुजारी यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी काळ्याफिती लावून आंदोलनात सहभागी झाले होते.

राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव शासनाकडे २०२५ पासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली आहे.

या संदर्भात मुंबई येथे १६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत चारही महासंघांनी एकत्रितपणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून कामकाज केले. वेतनवाढीच्या प्रस्तावाला शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन मंजुरी द्यावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

१६ व १७ ऑक्टोबर : काळ्याफिती लावून कामकाज

५ नोव्हेंबर : सामूहिक रजा आंदोलन

१७ नोव्हेंबरपासून : मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप

वेतनवाढीचा प्रस्ताव तातडीने निकाली काढावा व प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी केली आहे.

# डॉ. जयप्रकाश तोरणे यांचे दुःखद निधन



नाशिक – स्टेट बँकेच्या गंगापूर रोड शाखेचे माजी व्यवस्थापक डॉ. जयप्रकाश नारायण तोरणे (वय ७८) यांचे नुकतेच इंदिरानगर येथे दुःखद निधन झाले. मुंबईच्या बी. व्हि. एस. कॉलेजमधील पशु वैद्यकीय शाखेची पदवी संपादन करून नासिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून त्यांनी काही वर्षे कार्य केल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कृषी विभागात त्यांची निवड झाली. तेथेच बँकेच्या विविध विभागात काम करून सटाणा, मेथी, साकोली, मुंबई, नासिक शाखेत व्यवस्थापनाचे कार्य केले. महाराष्ट्रातील पशु वैद्यकीय अधिकारी संघटनेचे ते नेते होते. विविध साहित्याचे वाचन लेखन व पर्यटनात आणि विविध सामाजिक उपक्रमात त्यांनी निवृत्ती नंतर भर दिला.

त्यांच्या मागे पत्नी शीला व दोन विवाहित मुले सत्येन (अमेरिका) व स्नेहल (पुणे) सूना, नातू आणि समस्त तोरणे कुटुंबीयांचा तसेच मित्रांचा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगरच्या लष्करी वसाहतीत विंग कमांडरच्या घरातून ७ लाख ७५ हजारांच्या ऐवजाची चोरी

नगर – अहिल्यानगर येथील आर्मड कोअर सेंटरमध्ये राहणाऱ्या एका विंग कमांडरच्या बंद घराचे लोखंडी ग्रील तोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल ७ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहन किशोर कुलकर्णी (वय ४०) हे अहिल्यानगर येथील आर्मड कोअर सेंटरमध्ये विंग कमांडर पदावर कार्यरत आहेत. त्यांचे घर क्रमांक पी–३९/१ येथे आहे. फिर्यादी व त्यांचे कुटुंब काही कामानिमित्त घराबाहेर गेले होते. यादरम्यान, १२ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजेपासून ते १६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजेपर्यंतच्या काळात अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराची पाहणी केली. त्यानंतर चोरट्यांनी घराच्या खिडकीचे लोखंडी ग्रील कटर किंवा इतर साधनांच्या सहाय्याने तोडून आत प्रवेश केला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरांनी कपाटात व इतर ठिकाणी शोध घेऊन मौल्यवान साहित्याची व दागिन्यांची नासधूस व चोरी केली. या चोरीमध्ये रोहन कुलकर्णी यांच्या मालकीचा दोन लाख रुपयांचा कॅमेरा, दीड लाख रुपयांची महागडी लेन्स, तसेच इतर वेगवेगळ्या प्रकारच्या तीन लेन्स असा एकूण चार लाख रुपयांचा कॅमेऱ्याचे साहित्य चोरट्यांनी पळवले आहे. याशिवाय, घरात ठेवलेले एक लाख रुपयांचे हिऱ्याचे कानातील टॉप्स, ७५ हजार रुपयांची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन आणि ५० हजार रुपयांची चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा एकूण ७ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. फिर्यादी रोहन कुलकर्णी यांनी १६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी उशिरा भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात येऊन घडलेल्या प्रकाराची फिर्याद दिली.

या फिर्यादीनुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडी व चोरीचा गुन्हा नोंदवला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरु आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पवनचक्की पाहण्यासाठी गेलेल्या तरुणीवर अत्याचार प्रकरणी दोघा जणांना अटक

## न्यायालयाने सुनावली २१ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

नगर – नगर तालुक्यातील देवगाव परिसरात पवनचक्की पाहण्यासाठी गेलेल्या एका २२ वर्षीय तरुणीवर दोघा नराधमांनी दुचाकीवरून निर्जनस्थळी नेऊन सामूहिक अत्याचार केल्याची अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी अहिल्यानगर शहरात खासगी नोकरी करते व सावेडी परिसरात राहते. तिच्यासोबत काम करणारा २० वर्षीय तरुण तिचा मानलेला भाऊ आहे.

१५ सप्टेंबर रोजी सायंकाळी दोघे दुचाकीवरून देवगाव परिसरातील पवनचक्की पाहण्यासाठी गेले होते. साडेसहाच्या सुमारास ते एका पवनचक्कीजवळ थांबले असताना, तिथे दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्यांना हटकले आणि शिवीगाळ केली.

विरोध केला असता सोबतच्या तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. त्यानंतर बळजबरीने तरुणीला एका दुचाकीवर आणि सोबतच्या तरुणाला दुसऱ्या दुचाकीवर बसवून घाटाच्या दिशेने निर्जन भागात नेण्यात आले. तिथे दोघांचे मोबाईल हिसकावून घेत आरोपींनी तरुणीवर अत्याचार केला. दरम्यान, तिथे आलेल्या दोन तरूण नागरिकांनी धाडस दाखवत पीडित तरुणी आणि तिच्या मानलेल्या भावाची सुटका केली, त्यानंतर आरोपी पसार झाले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा व तालुका पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम राबवून संशयित संदेश गोरक्षनाथ शिंदे आणि मोहित अशोक खळे (दोघे रा. देवगाव) यांना ताब्यात घेतले. न्यायालयाने त्यांना २१ सप्टेंबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे पुढील तपास करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### थंडगार पाणी पिणे योग्य आहे का?

उन्हाळ्याच्या दिवसात किंवा कडक उन्हातून घरात आल्यावर किंवा व्यायाम करून आल्यावर थंड पाणी प्यायल्याने शरीराला एकदम गारवा मिळतो आणि मनाला खूप बरे वाटते म्हणून बहुतेक लोकांना थंड पाणी पिणे आवडते पण आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर नेहमीच अति थंड किंवा फ्रीजमधील बर्फासारखे गार पाणी पिणे हे चांगले नाही असे डॉक्टर आणि आयुर्वेद दोन्हीमध्ये सांगितले जाते कारण आपल्या शरीराचे तापमान हे साधारणपणे उबदार असते आणि जेव्हा आपण खूप थंड पाणी पितो तेव्हा शरीराला ते पाणी गरम करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते त्यामुळे शरीराची ऊर्जा वाया जाते आणि पचनसंस्थेवर त्याचा परिणाम होतो विशेषतः जेवण झाल्यावर लगेच थंड पाणी प्यायल्यास जेवणातील तेलकट पदार्थ घट्ट होतात आणि ते पचायला खूप वेळ लागतो त्यामुळे पोट जड होणे गॅस होणे किंवा अपचन होणे असे त्रास सुरू होतात तसेच ज्या लोकांना वारंवार सर्दी खोकला होतो किंवा घसा दुखतो किंवा टॉन्सिल्सचा त्रास आहे त्यांनी थंड पाणी पूर्णपणे टाळावे कारण थंड पाण्याने घशातील नसा आकुंचन पावतात आणि संसर्ग लवकर होतो काही लोकांमध्ये थंड पाणी प्यायल्याने दात दुखणे किंवा डोकेदुखीचा त्रास वाढलेला दिसतो. सायनस असलेल्या लोकांना तर थंड पाणी अजिबात मानवत नाही. दुसरीकडे साधे किंवा माठातील पाणी किंवा किंचित कोमट पाणी पिणे हे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. कोमट पाण्यामुळे पचन सुधारते रक्ताभिसरण चांगले होते. शरीरातील घाण बाहेर निघण्यास मदत होते आणि वजन नियंत्रणात राहण्यासही मदत मिळते. याचा अर्थ थंड पाणी कधीच पिऊ नये असे नाही जर बाहेर खूप उष्णता असेल आणि शरीर खूप तापले असेल तर थोडे थंड पाणी थोडे थोडे करून पिण्यास हरकत नाही पण एकाच वेळी खूप सारे बर्फाचे पाणी पिऊ नये आणि जेवणाच्या आधी आणि नंतर अर्धा तास तरी थंड पाणी टाळावे. लहान मुले आणि वयस्कर लोकांनी तर शक्यतो साधेच पाणी प्यावे शेवटी सांगायचे झाले तर तहान भागवण्यासाठी आणि आरोग्य चांगले ठेवण्यासाठी अति थंड पाण्यापेक्षा माठातील नैसर्गिक थंड किंवा साध्या तापमानाचे पाणी पिणे हीच सर्वात योग्य आणि सुरक्षित सवय आहे.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### मोतीचूर मोदक

**साहित्य :** बेसन १ वाटी, बारीक रवा १ चमचा, केशरी फूड कलर १/४ चमचा, तळण्यासाठी तेल, साखरेसाठी साखर १ वाटी, पाणी ३/४ वाटी, वेलची पावडर १/२ चमचा, लिंबाचा रस २-३ थेंब, बारीक चिरलेले पिस्ते १ चमचा, बारीक चिरलेले बदाम १ चमचा, खवा २ चमचे, साजूक तूप १ चमचा

**कृती :** बेसनात रवा आणि फूड कलर घालून पाण्याने सरसरीत पीठ भिजवून घ्या. हे पीठ १५ मिनिटे झाकून ठेवा. एका कढईत तेल गरम करा. मोतीचूरची झारी घेऊन त्यावर पीठ टाकून गरम तेलात मोती पाडून घ्या. मोती जास्त कुरकुरीत तळू नका, हलके तळून काढा. सर्व पिठाचे मोती तळून घ्या. दुसऱ्या भांड्यात साखर आणि पाणी घालून एकतारी पाक तयार करा. त्यात लिंबाचा रस आणि वेलची पावडर घाला. पाकात तळलेले मोती घालून मिश्रण एकजीव करा. त्यात खवा, तूप, पिस्ते आणि बदाम घालून १० मिनिटे झाकून ठेवा. मिश्रण थोडे कोमट झाल्यावर हाताला थोडे तूप लावून मोदकाच्या साच्यात भरून मोतीचूर मोदक तयार करा. तयार मोदक पिस्त्याने सजवून सर्व्ह करा.

## वास्तू

### वास्तुसाठी चांगला सुगंध

* घरासाठी चंदन, गुलाब, मोगरा, जाई, केवडा आणि लोबान यांचा सुगंध सर्वात शुभ मानला जातो. चंदनाच्या सुगंधाने मन शांत होते आणि घरात पवित्रता राहते. गुलाबाच्या सुगंधाने पती-पत्नीमधील प्रेम वाढते.

* घरात खूप उग्र, केमिकलयुक्त स्प्रे किंवा खूप तीव्र अत्तराचा वापर टाळावा. वास्तुनुसार यामुळे डोकेदुखी भांडण वाढते.

## सौंदर्य

लिप बाम लावा आणि त्यावर हलक्या गुलाबी किंवा न्यूड रंगाची लिपस्टिक लावा. खूप गडद रंग नैसर्गिक मेकअपमध्ये वापरू नका.

## सल्ला

तळलेले पदार्थ तेलातून काढल्यावर टिश्यू पेपरवर ठेवा. पेपर सर्व जास्तीचे तेल शोषून घेतो. तसेच तेल पुन्हा पुन्हा वापरू नका, जुन्या तेलाने तवंग जास्त येतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६

**गौरी पूजन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, ज्येष्ठा २२|४५, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** धनलाभाचे योग आहेत. घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ :** कामात यश मिळेल. जुन्या मित्रांची भेट होईल.

**मिथुन :** दिवस धावपळीचा जाईल. खर्चात वाढ होईल.

**कर्क :** मनातील इच्छा पूर्ण होईल. प्रवास घडेल.

**सिंह :** मान सन्मान वाढेल. नोकरीत बढतीचे योग आहेत.

**कन्या :** अडकलेले पैसे परत मिळतील. कौटुंबिक सुख लाभेल.

**तूळ :** नवीन संधी मिळेल. व्यवसायात वाढ होईल.

**वृश्चिक :** आरोग्यात सुधारणा होईल. शुभ वार्ता मिळेल.


**धनु :** भाग्याची साथ मिळेल. धार्मिक कार्य घडेल.

**मकर :** कामाचा ताण वाढेल. संध्याकाळी दिलासा मिळेल.

**कुंभ :** प्रेमात यश मिळेल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.

**मीन :** शत्रूवर विजय मिळेल. कोर्टाच्या कामात यश येईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२५४ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) देव आनंद, नूतन यांचा एक चित्रपट ५) ++ ++ मेरे बच्चे (चित्रपटाचे नाव) ७) ++ जमाना (चित्रपटाचे नाव) ९) +++ टंडन (एक अभिनेत्री) १२) शम्मी कपूर, शर्मिला टागोर, नझीर हुसेन, प्राण यांचा एक चित्रपट १५) छोटीसी उमर मे लग गया रोग कहते हैं लोग मै ++ जाऊं (गाणे) १६) ++ कमल (चित्रपटाचे नाव) १७) विश्वजीत, माला सिन्हा यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) जॅकी श्रॉफ, पूनम धिल्लन, अमरीश पुरी, सदाशिव अमरापूरकर यांचा एक चित्रपट २) गोविंदा, फराह, ऋषी कपूर यांचा एक चित्रपट ३) मेरे +++ की सहेली (चित्रपटाचे नाव) ४) ++ धुपिया (एक अभिनेत्री) ६) एक प्रसिद्ध दिवंगत संगीतकार ८) ऋतिक रोशन, करिना कपूर, जॅकी श्रॉफ, अमरीश पुरी यांचा एक चित्रपट १०) ओम पुरी, प्रिया तेंडुलकर यांचा एक चित्रपट ११) ++ घटा (चित्रपटाचे नाव) १३) धर्मेंद्र, रेखा, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट १४) धरम +++ (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** वेळ आणि शब्द दोन्ही खूप महत्वाचे आहेत, एकदा गेले की परत येत नाहीत.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कच्चे अंडे पातळ, उकडले की दगडासारखे कडक! असं का होतं माहित आहे का?

सकाळच्या न्याहरीपासून ते मोठ्या मेजवानीपर्यंत अंडे हा सर्वांच्या आवडीचा पदार्थ आहे. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण आवडीने अंडे खातात. पण अंडे खाताना आपल्यापैकी फार कमी जणांनी एका गमतीशीर गोष्टीचा विचार केला असेल. कच्चे अंडे हातात घेतले तर ते किती नाजूक असते. जरा जोरात दाबले तरी फुटून त्यातला पातळ द्रव बाहेर येतो. पण तेच अंडे गरम पाण्यात दहा मिनिटे उकडले की ते इतके कडक होते की आपण त्याला सहज कापू शकतो, त्याचे दोन भाग करू शकतो, अगदी खाली पाडले तरी ते फुटत नाही. पातळ द्रवाचे घन पदार्थात होणारे हे रूपांतर कसे होते, हा खराखुरा स्वयंपाकघरातला चमत्कार आहे.

हे रहस्य समजून घेण्यासाठी आधी अंड्याच्या आत काय आहे हे पाहावे लागेल. अंड्याच्या कवचाच्या आत दोन मुख्य भाग असतात. एक पारदर्शक पांढरा भाग आणि दुसरा पिवळा बलक. या दोन्ही भागात मोठ्या प्रमाणावर पाणी असते. या पाण्यात अतिशय बारीक असे सत्वाचे धागे तरंगत असतात. हे धागे आपल्या डोळ्यांना दिसत नाहीत इतके सूक्ष्म असतात. कच्च्या अवस्थेत हे सर्व धागे स्वतःभोवती गोल गोल गुंडाळी करून बसलेले असतात. जसे आपण लोकर व्यवस्थित गुंडाळून गोळा करून ठेवतो तसे. प्रत्येक धागा वेगळा असल्यामुळे आणि त्यांच्यामध्ये पाणी असल्यामुळे संपूर्ण अंडे द्रव आणि पातळ राहते.

आता जेव्हा आपण हे अंडे उकळत्या पाण्यात टाकतो तेव्हा बाहेरची उष्णता हळूहळू कवचातून आत शिरते. ही उष्णता आतल्या धाग्यांना हलवायला लागते. जास्त उष्णता मिळाल्यामुळे गुंडाळलेले धागे गरमीने व्याकूळ होतात आणि त्यांची गुंडाळी उलगडू लागते. एकदा उलगडले की हे धागे पुन्हा पूर्वीसारखे गोल होत नाहीत. ते लांब होऊन एकमेकांच्या जवळ येतात आणि एकमेकात अडकू लागतात. एका धाग्याचे टोक दुसऱ्या धाग्याला धरते, दुसऱ्याचे तिसऱ्याला. अशा प्रकारे हजारो धागे एकमेकात गुंतून एक मोठी आणि मजबूत जाळी तयार होते ही जाळी तयार होणे हीच कडक होण्याची खरी प्रक्रिया आहे. जेव्हा ही जाळी घट्ट होते तेव्हा ती आत असलेल्या पाण्याला बाहेर जाऊ देत नाही. पाणी त्याच जाळीमध्ये बंद होते. त्यामुळे आधी जे पाणी मोकळे वाहत होते तेच पाणी आता घट्ट जाळीत अडकून घन स्वरूप धारण करते.

आपल्या घरातील शेवया कशा एकमेकात गुंतून गोळा तयार करतात अगदी तसेच हे घडते. फरक इतकाच की शेवयांचा गोळा आपल्याला दिसतो, पण अंड्यातील जाळी डोळ्यांना दिसत नाही. पांढरा भाग आणि पिवळा भाग कडक होण्याची वेळ वेगळी असते. पांढऱ्या भागातील सत्व कमी उष्णतेत म्हणजे साधारण साठ अंशावरच जाळी बनवायला सुरुवात करते, तर पिवळ्या भागाला जास्त उष्णता लागते. म्हणूनच कधी कधी अर्धवट उकडलेल्या अंड्यात पांढरा भाग घट्ट झालेला असतो पण पिवळा भाग अजूनही मऊ आणि पातळ राहतो.

ही प्रक्रिया एकदा घडली की ती उलट करता येत नाही. म्हणजे उकडलेले अंडे पुन्हा कधीही कच्चे होऊ शकत नाही. कारण एकदा एकमेकात गुंतलेले धागे पुन्हा वेगळे होऊ शकत नाहीत. जर आपण अंडे खूप जास्त वेळ उकडले तर ही जाळी आणखी घट्ट होते आणि त्यातून काही नैसर्गिक वायू बाहेर पडतो. हाच वायू पिवळ्या भागाभोवती जमा होऊन तेथे हिरवट काळे वलय तयार करतो. ते वलय म्हणजे अंडे जास्त शिजल्याची खूण असते निसर्गाने ही व्यवस्था अतिशय विचारपूर्वक केली आहे. कोंबडीच्या पिल्लाला वाढण्यासाठी कच्च्या अवस्थेतील पातळ सत्व लागते.

ते त्याला सहज पचते. पण बाहेरच्या उष्णतेपासून किंवा धक्क्यापासून रक्षण करण्यासाठी तेच सत्व घट्ट होण्याचा गुणधर्म त्यात ठेवला आहे. म्हणूनच स्वयंपाकघरातील हा छोटासा प्रयोग आपल्याला निसर्गाच्या मोठ्या किमयेची ओळख करून देतो.

### एकमेकांचा आदर

जुन्या शर्यतीत हरल्यानंतर ससा खूप नाराज झाला होता. सगळे प्राणी त्याला हसायचे, पाहा, वेगवान ससा हरला!सशाने ठरवले, आता मी पुन्हा कधीच गर्व करणार नाही आणि झोपणारही नाही.काही दिवसांनी कासव सशाकडे आले आणि म्हणाले, मित्रा, पुन्हा एकदा शर्यत लावूया का?

ससा म्हणाला, लावूया, पण यावेळी रस्ता तू ठरव.कासवाने एक वेगळा रस्ता निवडला. त्या रस्त्यात मध्ये एक मोठी नदी लागणार होती. शर्यत सुरू झाली. ससा जोरात पळाला. न थांबता, कुठेही न झोपता तो नदीकाठापर्यंत पोहोचला. पण पुढे मोठी नदी होती.


सशाला पोहता येत नव्हते. तो काठावरच अडकून बसला. इकडे कासव हळू हळू चालत नदीकाठी आले. कासवाला पोहता येत होते. ते आरामात नदी पोहून पलीकडे गेले आणि शेवटच्या टोकाला पोहोचले. ससा नदीच्या पलीकडच्या काठावरून हे पाहत होता.

कासव परत आले आणि सशाला म्हणाले, मित्रा, तू वेगवान आहेस, पण मला पोहता येते. आपण दोघेही वेगवेगळ्या गोष्टीत हुशार आहोत सशाला नवीन गोष्ट कळली. तेव्हा ससा म्हणाला, आपण एकमेकांशी स्पर्धा करण्यापेक्षा एकमेकांना मदत करूया.

दुसऱ्या दिवशी त्यांनी एकत्र शर्यत लावली. जमिनीवर सशाने कासवाला पाठीवर घेतले आणि जोरात पळाला. नदी आल्यावर कासवाने सशाला पाठीवर घेतले आणि नदी पार केली.दोघेही एकत्र शर्यतीच्या शेवटाला पोहोचले.जंगलातील सर्व प्राण्यांनी टाळ्या वाजवल्या.

तात्पर्य : प्रत्येकाकडे वेगळे गुण असतात. दुसऱ्याला कमी लेखण्यापेक्षा एकमेकांच्या गुणांचा आदर केला आणि एकत्र काम केले तर अशक्य गोष्टही शक्य होते. स्पर्धेपेक्षा सहकार्य मोठे असते.

## आत्मशक्ति



### प्रेम वाहू द्या

जोडलो गेलो तर आमच्या जीवनाच्या इतर बाजूही जास्त विकसित होऊ शकतील. त्यामुळे आमच्या इतर कामातही सुधारणा होतील. ही उपाययोजना जणू बचत खात्यात पैसे टाकण्यासारखीच आहे. त्यामुळे जसे पैसे जमा राहून त्यावर व्याजही मिळते व भविष्यात खर्च करण्यासाठी तरतूदही करता येते.

निवड आमची असते, जर आम्ही इच्छिले तर आत्मा चैतन्यमय बनवून ईश्वरी उपहारांचा आनंद मिळवू शकतो. नंतर आपल्या दिनचर्येच्या प्राधान्याला निर्धारित करून त्यावर कायम राहू शकतो. आम्ही आमच्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी रचनात्मक पद्धतींचा अवलंब करू शकतो. आत्म्याला चेतन करण्यासाठी वेळ काढू शकतो. असे केल्याने आम्ही आत्मिक आनंद, शांति आणि प्रेमाची मजा, आनंद लुटू शकतो. आमचा आत्मा अनेक आवरणाने झाकला गेला आहे. आम्ही काया, वाचा, मनें केलेल्या कर्माची छाप ह्या आवरणावर पडतात. आमच्या स्वच्छ त्वचेवर घाणेरडे काळेकुट्ट डाग पडावेत तसे डाग आमच्या कुकर्माने पडतात. आमच्या ह्या प्रकाशमय आत्म्याचे दर्शन घेण्यापूर्वी हे डाग पुरते काढावयास हवेत. आम्ही जे जे मनात चिंतले, बोललो व केले त्या कर्माद्वारे आणि काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार यापासून हे डाग तयार झाले. आत्म्याच्या निर्मळ शक्ती व सत्तेचा अनुभव घेण्यापासून आम्हाला दूर ठेवतात. आमच्या आत्म्याचा प्रकाश झाकून ठेवणाऱ्या ह्या आवरणांना आम्ही बाजूला केले पाहिजे.अधिक स्पष्टीकरणार्थ आपण बल्बाचे उदाहरण घेऊ या. पातळ काचेपासून बनलेला व आंत बारीक तार असलेला बल्ब प्रकाश देतो. जर ह्या बल्बावर पातळ सफेद कापड टाकले तर प्रकाश नियमानें कमी दिसेल. प्रकाश दिसेल पण बल्ब दिसणार नाही. जर ह्या बल्बावर रंगीत कापड टाकले तर प्रकाश अंधुकसा होईल व तो त्या कपड्याचा रंग घेईल. म्हणजेच बल्बाच्या सफेद प्रकाशाची जाणीव होणार नाही. जर ह्या बल्बावर आम्ही चादर वा कांबळे टाकले तर प्रकाश अधिकच अस्पष्ट होईल. जेवढी जेवढी आवरणे टाकत जाऊ तेवढ्या प्रमाणात प्रकाश दिसेनासा होत जाईल.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### आत्माचे महापाप

सुरेश ओबेरॉय : पण हे मी माझ्या मुलीवरच्या प्रेमापोटी केलं. हे मी इतरांच्या बाबतीत कसं करू शकेन?

शिवानीदीदी : 'बीइंग लव्ह' लक्षात ठेवा. याचा अर्थ, इतरांवर प्रेम करण्यासाठी आपल्याला कष्ट घ्यायची गरज नाही कारण प्रेम हाच आत्म्याचा मूळ गुण आहे. जो आपल्याकडून सगळ्या आत्म्यांकडे स्वाभाविकरीत्या प्रसारित होतो. जेव्हा आपण इतरांवर टीका करतो तेव्हा प्रेमाच्या ऊर्जेत अडथळा येतो. एका वेळी, या दोन्हींपैकी कोणतीही एकच ऊर्जा प्रवाहित होऊ शकते. नुकसान कितीही मोठं असलं तरीही वस्तू ही वस्तूच असते. आत्म्याने केलेल्या चुकीपेक्षा एक आत्मा निश्चितच जास्त महत्त्वाचा असतो. भलेही एखाद्या आत्म्याने महापाप केलं असलं तरीही त्या आत्म्याचं सशक्तीकरण हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. एकदा आत्मा सशक्त झाला की, तो पुन्हा ती चूक करणार नाही.

सुरेश ओबेरॉय : कधीकधी डॉक्टरही चुकू शकतात. कित्येकदा त्यांच्याकडूनही मोठमोठ्या चुका होतात.

शिवानीदीदी : हो, हे शक्य आहे. त्या वेळी जर डॉक्टरांवर जास्त टीका झाली तर त्यांची काम करण्याची क्षमता कमी होईल. भलेही त्यांची चूक कितीही मोठी असली तरीही त्या माणसावर हल्ला करण्याऐवजी त्याच्या कामावर लक्ष द्यायला हवं. त्या व्यक्तीची कामाची पद्धत योग्य नाही हे आपण त्यांना सांगायला हवं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, पुढच्या वेळेस योग्य प्रकारे काम कसं करायचं हे आपण त्यांना सांगायला हवं.आईवडील आणि मुलं या नात्यातही, पुढच्या वेळेस काय करायला हवं याकडे पालक लक्ष देत नाहीत तर जास्तकरून घडलेल्या घटनेबद्दल ते चर्चा करतात. आपल्या संभाषणात, आधी जे घडून गेलंय त्यावर लक्ष केंद्रित करायची गरज नाही कारण त्यामुळे आपली ऊर्जा कमी होते. आपल्या संभाषणात उपाय योजना, सुधारणा आणि सशक्तीकरण या गोष्टी केंद्रस्थानी असायला हव्यात.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर :** तुला काय त्रास होतोय?

**रुग्ण :** डॉक्टर, मला सगळे विसरायला होतंय!

**डॉक्टर :** कधीपासून? **रुग्ण :** कधीपासून काय?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगात सर्वात जास्त अण्वस्त्रे कोणत्या देशाकडे आहेत?

– रशिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### विवाह ठरल्यानंतर

प्राजक्ता माझी भेट घेण्यासाठी क्लिनीकमध्ये आली होती. भेटल्यानंतर तिने मला सांगितले की, माझे लग्न जमले आहे. माझे होणारे पती व मी एकाच कंपनीमध्ये नोकरी करत आहोत. आमच्या रोजच भेटी होत असतात; परंतु लग्न जमल्यापासून आम्हाला दोघांनाही वैवाहिक जीवनाविषयी मानसिक ताण असतो. मनात विचार आला तर उगीचच भीती वाटते. या करिता मला व माझ्या होणाऱ्या पतीला म्हणजेच गौरवला तुमचे मार्गदर्शन घ्यायचे आहे. प्राजक्ताचे बोलणे ऐकल्यावर तिच्या भावी पतीला मी क्लिनीकमध्ये बोलावले.

दोघेही सुरुवातीला खूप शांत व गंभीरपणे बसले होते. त्यानंतर मीच ह्या विषयावरून बोलते केले. तुम्हाला वैवाहिक, शारीरिक संबंधाबद्दल काही माहिती आहे का? असे विचारल्यावर त्यांनी, आम्हाला यातील थोडी-फार पुस्तके वाचून माहिती आहे; परंतु शास्त्रोक्त माहिती काहीच नाही. मी त्या दोघांना क्लिनीकमध्ये असणाऱ्या गर्भाशयाच्या चार्टवरून माहिती सांगितली.

स्त्रियांमध्ये रजःस्राव म्हणजेच पाळी ही अवस्था वयाच्या १३ व्या वर्षापासून ते ४५ व्या वर्षापर्यंत असते. स्त्रियांचे स्त्रीबीज तयार होण्यासाठी गर्भाशयाच्या दोन्ही बाजूला स्त्री बीजकोष असतात. प्रत्येक महिन्याला उजव्या किंवा डाव्या स्त्री-बीजकोषातून बीज बाहेर पडते. प्रत्येक महिन्याच्या मासिक पाळीच्या स्रावानंतर ५ व्या दिवसापासून स्त्री-बीजकोषामध्ये स्त्री-बीजाची वाढ होते. मासिक पाळीच्या १२ व्या दिवसापासून ते १८ व्या दिवसापर्यंत स्त्री-बीज तयार होऊन परिपक्व होते व फुटते. फुटल्यानंतर ते बीज वाहिनी

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



श्री विशाल गणेशास सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्सच्या बोरा परिवाराच्या वतीने सुमारे २४ लाख रुपये किमतीचे सुवर्ण रत्नजडित तिलक अलंकार अर्पण केले.

# श्री विशाल गणेशाच्या माथी सुवर्ण, माणिक अन् हिऱ्यांनी साकारलेले तीलक विराजमान

## बोरा परिवाराच्या वतीने २४ लाखांचे अलंकार अर्पण

नगर – नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाच्या मूर्तीला सुवर्ण, माणिक अन् हिऱ्यांनी साकारलेल्या अलंकारांनी सजविण्यात आले. नगरच्या सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्सचे संचालक बोरा परिवाराच्या वतीने सुमारे २४ लाख रुपये किमतीचे सुवर्ण रत्नजडित तिलक अलंकार गणेशोत्सव व संवत्सरीच्या मुहूर्तावर श्री विशाल गणेश मंदिरात विधिवत पूजा व महाआरती करून बुधवारी अर्पण केले. यामध्ये श्री विशाल गणेशासाठी सुवर्णात घडविलेले व खास जपानहून आयात केलेल्या पांढऱ्या पवळ्यांचे त्रीपुंड्र तिलक, माणिक रत्नांचे त्रिनेत्र तिलक तसेच माणिक व हिऱ्यांनी साकारलेले त्रिशूल तिलक या अलंकारणाचा समावेश आहे. श्री विशाल गणेशाचे मुख्य पुजारी महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते हे अलंकार गणेशाच्या माथी विराजमान करण्यात आले. यावेळी तालयोगी ढोल पथकाची ढोल ताशांच्या गजरात विशाल गणपतीस मानवंदना देण्यात आली. यावेळी गणपती बाप्पाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

बाबूशेठ बोरा, अजित बोरा, ईश्वर बोरा, विनीत बोरा, गौतम बोरा यांच्यासह बोरा परिवारातील सदस्य व महिलांनी हे सुवर्ण रत्नजडित अलंकार महंत संगमनाथ महाराज व मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अभय आगरकर यांच्याकडे सुपूर्द केले. तत्पूर्वी सर्व सदस्यांनी श्री विशाल गणेशाची विधिपूर्वक पूजा व महाआरती केली.

देवस्थानचे सचिव अशोक कानडे यांनी बोरा परिवाराचे आभार मानून त्यांचा सत्कार केले.

या कार्यक्रमास समर्पण चातुर्मासच्या लाभार्थी राखी सौरभ बोरा, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमातीलला कोठारी, डॉ.विजय भंडारी, मधुसूदन सारडा, मोहन मानधन, राजेश भंडारी,संतोष गांधी, डॉ.पारस कोठारी, विजय गुंदेचा, राजेश भंडारी मर्चंट बँकेचे संचालक किशोर गांधी, अनिल पोखरणा व मीना मुनोत, ॲड. ए. के. गुगळे, महावीर कांकरिया, संजय बोगावत, महेश गुंदेचा, चिंटू खंडेलवाल, हितेश गुप्ता, महेंद्र सहदेव, संजय बोगावत, वरुण चोपडा, पवन झंवर, चिराग शाह, अक्षय बकलीवाल तसेच बोरा परिवाराचे मिनल बोरा, हर्ष बोरा, निर्मला बोरा, शोभा बोरा, छाया बोरा, कविता बोरा, योगिता मुथा, विक्रम मुथा, जैनम बोरा, गगन बोरा, स्वाती गुंदेचा आदींसह मित्रपरिवार, विविध क्षेत्रातील नागरिक व भाविक उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कष्टाच्या अन्नातच खरी गोडी







एकदा गौतम बुद्धांकडे एक श्रीमंत आला. तो म्हणाला, अन्न गोड लागत नाही. चव ना तुपाला, ना दुधाला, अथवा जाणवतो सारखा शरीराला. कंटाळलो वैद्यांच्या औषधाला.

बुद्ध ध्यानस्थ बसले. त्यांनी जणू त्या श्रीमंताचे काहीच न ऐकले. बुद्धांचे शिष्य श्रीमंताला म्हणाले, आपण बसावे किंवा पलीकडच्या पडवीत अंग टाकावे. ध्यान संपताच तथागतांशी बोलावे, एक शिष्य कुऱ्हाड घेवून बाहेर पडला. स्वयंपाकासाठी लाकडं आणतो, असे म्हणाला. श्रीमंत नुसता बसून कंटाळला. दुसरा शिष्य तांदुळ निवड, भाजी तोड, तर काही पोथ्या सोड, असा कामात गुंग. श्रीमंत बैचेन झाला. घरच्यासारखे गाद्यागिरद्यांवर लोळत पडावे तर जमिनीवर फक्त एक घोंगडे दुसरा शिष्यही काही वेळाने म्हणाला, श्रीमंत, मी चाललो वनात, फळं आणायला नि गाईना चारायला. कंटाळलेला श्रीमंतही निघाला त्याच्यासोबत. दुपारी शिष्य आणि श्रीमंत परतले. श्रीमंत हळूच म्हणाला, नाही का तयार काही पोटात घालायला? काहीतरी हवंच खायला

शिष्य म्हणाला, थांबा थोडं लागतोच मी स्वयंपाकाला. श्रीमंताला धीर कुठला? जंगलात फिरुन आधीच थकलेला होता. कंदमुळे होती आणलेली. तीच लागली खायला. काय सुरेख चव कंदमुळांना.

आता गौतम बुद्धांचे ध्यान संपले होते. पण श्रीमंताचे तिकडे लक्षच नव्हते. जंगलातून आणली होती बोरे, ती मिटक्या मारीत खाण्यात मन गुंतले. गौतम बुद्ध हसले. शिष्याला म्हणाले, अरे श्रीमंतांना दिलीस ती कंदमुळ आणि बोरं ? तू अगदीच निर्बुद्ध कसा रे?

श्रीमंत म्हणाला, अहो केवढं चवदार सारं. खरंच आता कळलं, की चव फळात नसते तर जिभेत असते. जंगलात फिरुन स्वतः कष्ट केले. फळ मिळालं. ते गोड लागलं.

गौतम बुद्धांच्या पायांवर श्रीमंताने डोके ठेवले. बकमुनी इंद्राला म्हणाले होते, बसायला पाट, चांदीचे ताट, उदबत्यांचा घमघमाट, जेवणात पक्वान्नांचा थाट, पण इंद्र बसला ताठ. मुरडले त्यांनी नाक. कसला हा जेवणाचा घाट. चवच नाही यात. संपली का साखेरतली गोडी ? तुपालाही ना स्वाद. ना चिकणाई. बक मुनी बसले होते समोर. त्यांना

इंद्र म्हणाला, पाहा ना तुम्ही खाऊन. बक म्हणाले, मी आलो जेऊन. इंद्र म्हणाला, तुमच्या झोपडीत असणार भाजीपाला.

बक म्हणाले, होय! पण मी तो स्वतः शिजवला. काय गोड लागला. तू दुसऱ्याच्या कष्टावर न जगता स्वत: मेहनत कर. स्वावलंबनाची कास धर. मग अन्न गोड लागेल.

कष्टाची खरी भाजी आणि भाकरी. ती आयत्या मिळालेल्या पुरणपोळीच्या थोबाडीत मारी.

**– किशोर गांधी**

# गणेशोत्सवाने दिला ‘आपली पृथ्वी वाचवू या’चा संदेश; एमआयडीसीतील पॉलीमिक्ट ग्रुपचा पर्यावरणपूरक उपक्रम चर्चेत



लिलावती पार्क नागरदेवळे येथील भिंगार बेलेश्वर मित्र मंडळाचा गणेश.

नगर – ‘आपली पृथ्वी वाचवूया’ या संकल्पनेसह शाश्वत उत्पादनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत अहिल्यानगर एमआयडीसीमधील पॉलीमिक्ट ग्रुप पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत आहे. कंपनी कॅम्पसमध्ये गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेला आकर्षक देखावा, केवळ सजावट नसून उद्योग क्षेत्राने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा आणि शाश्वत उत्पादनाचाचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा संदेश देणारा आहे. उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणाचा विचार, संसाधनांचा योग्य वापर, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकास यांचे महत्त्व या देखाव्यातून अधोरेखित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे हा विचार केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित न ठेवता पॉलीमिक्ट ग्रुपकडून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे या देखाव्यातून दिलेला संदेश हा केवळ विचार नसून कंपनीच्या कार्यपद्धतीशी जोडलेला आहे.

प्रत्येक कंपनीने शाश्वत उत्पादनाचा विचार करून आपल्या उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केला तर भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वीचे संरक्षण करणे शक्य होईल. पुढील ५० वर्षांसाठी पृथ्वी टिकवायची असेल, तर आजपासूनच उद्योगांनी शाश्वत उत्पादनाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे, हा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. हा सुंदर आणि विचारप्रवर्तक देखावा साकारण्यासाठी पॉलीमिक्टच्या टीमने आपले कौशल्य, सर्जनशीलता आणि टीमवर्क पणाला लावले. या उपक्रमात मनीष अकोलकर, हर्ष राजगुरू, अथर्व पिंगे, धनश्री बारस्कर, आर्या हराळे, सम्राट मुरकुटे, संभाजी नवले, चांगदेव साठे, वीणा तट्टू, ऋषिकेश जाधव, तेजल खोडदे, संतोष भिताळे, रोशन भूवड, अण्णा अडागळे, अजय निमोणकर, किशोर कसबे, गणेश शिंदे, रवींद्र नन्नावरे, कल्याणी पंडुरे, अलवत कुमार, प्रवीण माने, भरत डोंगरे, आरती अनारसे, सुरभी देशमुख–खिस्ती, त्रिवेणी करांडे, रोहित मुळे, रावसाहेब पाटील यांनी योगदान दिले.

या उपक्रमासाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामचंद्र सुखटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चिन्मय सुखटणकर तसेच सिनियर मॅनेजमेंट टीममधील रवींद्र महाजन, शंतनू खानवेलकर, संजय राणे, वसंत पाटील, विशाल भट, प्रवीण कुलकर्णी, सारंग शुक्रे, प्रदीप गायकवाड, संजय पर्वत, जोशी, राजू केनी यांचे मार्गदर्शन लाभले.



एमआयडीसीमधील पॉलीमिक्ट ग्रुपने गणेशोत्सवात ‘आपली पृथ्वी वाचवूया’ या संकल्पनेसह शाश्वत उत्पादनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

# गणेशपूजेत तुळस का निषिद्ध?



श्रीगणेशाच्या विविध लीलांमागील आध्यात्मिक रहस्ये आहेत. श्रीगणेशाच्या पूजेत तुळस (तुलसीपत्र) का वर्ज्य मानली जाते?

हिंदू धर्मात तुळशीला अत्यंत वंदनीय आणि मोक्षदायिनी मानले गेले आहे. भगवान विष्णूंची कोणतीही पूजा तुळशीच्या पानाशिवाय पूर्ण होत नाही. परंतु हीच पावन वनस्पती विघ्नहर्ता गणपतीच्या पूजेत मात्र निषिद्ध मानली जाते. शास्त्रात स्पष्ट वचन आहे – ‘न तुलस्या गणाधिपं’ (गणपतीला तुळस वाहू नये). यामागे नेमकी कोणती कथा आहे आणि त्या कथेमागे कोणते गूढ आध्यात्मिक मर्म दडलेले आहे.

गणेश पुराण आणि पद्मपुराणातील संदर्भानुसार, ही कथा द्वापारयुगापूर्वीची आहे. एकदा बाल गणेश गंगा नदीच्या तीरावर अत्यंत शांत आणि एकाग्र चित्ताने तपस्येत लीन झाले होते. त्यांचे ध्यान बाह्य विश्वातील मोहापासून पूर्णपणे अलिप्त होते. ते अखंड ब्रह्मचर्य आणि आत्मज्ञानाच्या परमोच्च समाधीत बसले होते. त्यांच्या कपाळावर चंदनाचा शीतल टिळा होता, अंगावर पीतांबर झळकत होते आणि मुखावर अखंड साधनेचे दिव्य तेज पसरले होते.

त्याच वेळी धर्मात्मज तुळस (जी एका तपस्वी व सुंदर दैवी कन्येच्या रूपात होती) तीर्थयात्रा करत करत गंगेच्या त्या शांत तीरावर आली. गणरायाचे ते अलौकिक आणि तेजस्वी रूप पाहताच तुळशीचे मन त्यांच्यावर मोहित झाले. तिच्या मनात एक तीव्र इच्छा निर्माण झाली की, अशा स्थिर, बुद्धिमान आणि तेजस्वी पुरुषाशी आपला विवाह व्हावा.

आपली ही इच्छा पूर्ण करून घेण्यासाठी तिने गणेशाच्या चालू तपस्येत व्यत्यय आणला. ध्यानाचा भंग झाल्यामुळे भगवान गणेशांनी डोळे उघडले. समोर एक दिव्य कन्या उभी असलेली पाहून गणरायांनी शांत आणि संयमित वाणीने विचारले, हे कन्ये, तू कोण आहेस आणि एका तपस्व्याच्या साधनेत अडथळा आणण्याचे कारण काय?

**तुळशीने हात जोडून अत्यंत प्रेमाने गणरायाकडे आपली मागणी मांडली :** हे प्रभो, मी आपल्या तेजस्वी रूपावर मोहित झाले आहे. माझी अशी इच्छा आहे की आपण माझा पत्नी म्हणून स्वीकार करावा आणि माझ्याशी विवाह करावा. हे ऐकून गणरायांनी तुळशीला अत्यंत मायेने आणि गंभीरतेने समजावून सांगितले:

हे देवि, मी जन्मजात ब्रह्मचारी राहून विश्वाच्या ज्ञानाचे नियमन करण्याचा संकल्प केला आहे. माझे चित्त सांसारिक विलासात, कामवासनेत किंवा विवाहाच्या बंधनात रमणारे नाही. मी केवळ अंतर्मुख वैराग्याचा आणि अखंड ईश्वरीय कर्तव्याचा उपासक आहे. त्यामुळे मी तुझ्याशी विवाह करू शकत नाही. तू तुझा हा विचार सोडून द्यावा.

परंतु तुळस आपल्या हट्टावर ठाम राहिली. तिने गणपतीचे शब्द मानले नाहीत आणि पुन्हा पुन्हा त्यांच्या वैराग्याला आव्हान देत विवाहाचा अट्टाहास सुरू ठेवला. जेव्हा साधनेच्या मार्गात मोहाचा अडथळा वारंवार येतो, तेव्हा विवेकाला कठोर पाऊल उचलावे लागते. गणरायांनी त्रस्त होऊन तुळशीला शाप दिला:

तू एका अखंड ब्रह्मचारी योग्याला संसाराच्या मोहात ओढण्याचा अट्टाहास केलास. ज्या वैवाहिक सुखासाठी तू माझ्या साधनेत विघ्न आणलेस, ते सुख तुला शांततेने मिळणार नाही; तुझा विवाह एका क्रूर असुराशी (राक्षसाशी) होईल!

आपल्या प्रेमाचा असा कठोर नकार आणि मिळालेला भयंकर शाप ऐकून तुळशीचा स्वाभिमान दुखावला गेला. रागाच्या आणि संतापाच्या भरात तिनेही गणरायाला प्रतिशाप दिला:

ज्या विवाहबंधनापासून तू दूर पळत आहेस, त्याच संसारात तुला अडकावे लागेल. अतिशीघ्र तुझाही विवाह संपन्न होईल!

काळाच्या ओघात हे दोन्ही शाप सत्य ठरले. तुळस पुढील जन्मात ‘वृंदा’ म्हणून अवतरली आणि तिचा विवाह महापराक्रमी असुरराज ‘जालंधर’ याच्याशी झाला. पुढे भगवान विष्णूंच्या एका अलौकिक लीलेने जालंधराचा अंत झाला आणि वृंदेच्या पातिव्रत्यावर प्रसन्न होऊन साक्षात श्रीहरींनी तिला ‘तुलसी’ रूपात आपल्या मस्तकावर, वैकुंठात आणि शाळिग्राम शिळेवर सदैव वास करण्याचे वरदान दिले.

दुसऱ्या बाजूला, भगवान गणेशांचा विवाह प्रजापती विश्वकर्मा यांच्या दोन दैवी कन्यांशी – ‘रिद्धी’ आणि ‘सिद्धी’ यांच्याशी संपन्न झाला. परंतु, त्या तपोभंगाच्या दिवसापासून गणपतीच्या पूजेत तुळस कायमची वर्ज्य मानली गेली.

पुराणातील ही कथा म्हणजे केवळ दोन पात्रांमधील वरवरचा वाद नाही, तर ती मानवी साधनेतील दोन अत्यंत महत्त्वाच्या शक्तींचा अंतर्गत संघर्ष आहे:

गणपती हे मूलाधार चक्राचे स्वामी आहेत. मूलाधार म्हणजे साधनेचा पाया. जोपर्यंत मनातील चंचलता आणि वासना शांत होत नाहीत, तोपर्यंत आत्मज्ञान होत नाही. गणेशाची समाधी ही दर्शवते की, उच्च आध्यात्मिक उद्दिष्ट गाठण्यासाठी अंतर्मुख व्हावे लागते.

तुळस ही मुळात प्रकृतीचे, संसारातील नात्यांचे आणि सृष्टीच्या विस्ताराचे प्रतीक आहे. तुळशीने गणेशाकडे विवाहाची मागणी करणे, म्हणजेच संसारातील मायेने साधकाच्या वैराग्यावर घातलेली भुरळ आहे. साधक जेव्हा ध्यानाला बसतो, तेव्हा बाह्य आकर्षणे त्याला ओढण्याचा प्रयत्न करतात. गणेशाने त्या मोहाला दिलेला नकार हा शिकवतो की, आत्मसाक्षात्कारासाठी वासनेचा त्याग करणे अनिवार्य आहे. देवतांनी एकमेकांना दिलेले शाप हे प्रत्यक्षात विश्वाच्या हितासाठी घडलेली ईश्वरी योजना असते: तुळशीच्या शापामुळे गणेशाचा विवाह झाला, पण तो कोणत्याही सामान्य भौतिक मोहाशी झाला नाही. गणपतीचा विवाह ‘रिद्धी’ (सात्त्विक समृद्धी/बुद्धीची संपन्नता) आणि ‘सिद्धी’ (आध्यात्मिक क्षमता/अलौकिक शक्ती) यांच्याशी झाला. म्हणजेच, जेव्हा बुद्धी विवेकी बनते, तेव्हा समृद्धी आणि यश स्वतःहून तिच्या चरणांशी येतात. गणेशाच्या शापामुळे तुळस पुढे विष्णूंची परमप्रिया बनली. विष्णू हे विश्वाचे पालनकर्ते आहेत आणि तुळस ही प्रकृती आहे. त्यामुळे प्रकृतीचे खरे स्थान पालनकर्त्या नारायणाच्या चरणीच शोभून दिसते. गणरायांच्या नकारानेच तुळशीला थेट वैकुंठाचे सर्वोच्च पद मिळवून दिले.

आपल्या उपासनेत दोन प्रमुख मार्ग आहेत – एक ‘भक्तिमार्ग’ आणि दुसरा ‘ज्ञान/योगमार्ग’: विष्णू हे प्रेमाचे आणि संसाराचे रक्षक आहेत. तिथे देवाला सखा, पती किंवा रक्षणकर्ता मानले जाते. तुळशीचे समर्पण हे याच निस्सीम प्रेमाचे प्रतीक असल्याने ती विष्णूला प्रिय आहे.

गणपती हे बुद्धी, मूलाधार चक्र आणि साधनेची सुरुवात आहेत. इथे प्रेमापेक्षा ‘इंद्रियनिग्रह’, ‘चित्तवृत्तीचा निरोध’ आणि ‘शांतता’ महत्त्वाची असते. अनलासुर वधानंतर गणपतीचा आंतरिक दाह शांत करण्यासाठी अत्यंत शीतल, जमिनीशी जोडलेली आणि अहंकारशून्य असणारी साधी ‘दुर्वा’च योग्य ठरते.

तुळशीची ऊर्जा ही प्रकृतीची, आकर्षणाची आणि संसाराची आहे; तर गणेशाची ऊर्जा ही वैराग्याची आणि स्थिरतेची आहे. म्हणूनच या दोन भिन्न प्रवाहांचा एकत्र मेळ पूजेत घातला जात नाही

।। गणपती बाप्पा मोरया,
मंगलमूर्ती मोरया ।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# भिंगार येथील मानाच्या ‘देशमुख वाडा गणपतीची’ प्रतिष्ठापना



भिंगार – गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर भिंगारच्या मानाच्या देशमुख वाडा गणपतीची प्रतिष्ठापना दु.१२.३० वाजता विश्वस्त कार्तिक देशमुख यांच्याहस्ते करण्यात आली. पूजेचे पौरोहित्य प्रसाद कुलकर्णी गुरुजी यांनी केले. यावेळी मोरेश्वर मुळे, स्वप्निल मुळे, राजश्री गुजर, गरिमा देशमुख, अमोल नागपुरे, ललित राऊत, शिवाजी राऊत, अमोल कोरे, अनिल भोसले आदी उपस्थित होते.

हा गणेशोत्सव द्वादशी पर्यंत असतो. याकाळात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात. द्वादशीला अहिल्यानगर चे पोलीस अधीक्षक यांच्याहस्ते उत्थापन पूजेनंतर सनई चौघडे आणि ढोल, ताशांच्या गजरात पालखीतून श्रींची मिरवणूक निघते, गेली १०४ वर्षे ही परंपरा देशमुख कुटुंबियाने अबाधित राखली आहे. पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा हा उत्सव त्यामुळेच आपली ओळख शंभराहून अधिक वर्षे टिकवून आहे, अशी माहिती अध्यक्ष समीर देशमुख यांनी दिली.

# मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिर



मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव आणि १४ वा वर्धापन दिन निमित्त आनंदऋषीजी ब्लड सेंटर अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

नगर – मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव आणि १४ वा वर्धापन दिन निमित्त आनंदऋषीजी ब्लड सेंटर अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. ‘रक्तदान हेच श्रेष्ठ दान’ या संकल्पनेतून रक्तदान शिबिरचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला मित्र परिवाराचे आणि आनंदऋषीजी ब्लड सेंटरचे सुनील महानोर यांचे विशेष सहकार्य लाभले.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक कार्य असून, एका रक्तदात्याच्या योगदानामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचवता येते, त्यांना जीवनदान मिळू शकते. या संदेशातून मानवता, प्रेम आणि सेवाभावाचा आदर्श समोर ठेवत हा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांनी अश्या समाजोपयोगी कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष ईश्वर पवार यांच्या वतीने करण्यात आले.

रक्तदान हि काळाची गरज आहे, त्यासाठी नागरिकांना रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष स्वामी टाकळकर यांनी केले आहे. रक्तदानासारख्या शिबिरात सहभागी होऊन मानवसेवेच्या या पवित्र कार्यात योगदान देण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे शुभम टाकळकर, हिमांशु साखला, अंकुश गोयल, धिरज पोखरणा, मनोज लुनिया, विकी नारंग व सदस्याच्या वतीने करण्यात आले.





नगर शहरातील सांगळे गल्ली येथील ‘न्यू बीईसीटीपी’चे संचालक देविदास दुसा यांच्या कन्या कु. मनश्री व धनश्री यांनी शाडू मातीची गणपती मूर्ती हाताने बनवली. तसेच पुठ्ठा, कागदी कप, व कापूस या पासून शिव – शक्ती पुत्र गणेश हा देखावा तयार केला आहे.

# मुकुंदनगर प्रवेशद्वारावर स्पीड ब्रेकर बसवा, अन्यथा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन



छत्रपती संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवावेत, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत अहिल्यानगर जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.


नगर – छत्रपती संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवावेत, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत अहिल्यानगर जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर हा दाट लोकवस्तीचा परिसर असून, या भागात महानगरपालिका कार्यालयासह विविध शासकीय कार्यालये आहेत. तसेच सकाळच्या वेळेत शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने या रस्त्यावरून ये–जा करतात. या मार्गावरून वाहने वेगाने ये–जा करत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर तातडीने स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या मार्गावर वन कार्यालयासमोर पूर्वी स्पीड ब्रेकर बसविण्यात आले होते. मात्र, रस्त्याच्या पॅचिंगच्या कामामुळे ते नष्ट झाले आहेत. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा स्पीड ब्रेकर बसवावा. तसेच पुणे ते छत्रपती संभाजीनगर या विरुद्ध दिशेच्या मार्गावरील पूर्वीचे स्पीड ब्रेकरही पूर्ववत करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वी याच मार्गावर संभाव्य दुर्घटना होता होता टळली. भविष्यात मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली. मागणीची दखल न घेतल्यास रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही संबंधित अधिकाऱ्यांना समक्ष भेटून देण्यात आला.

या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, महिला शहर जिल्हाध्यक्ष अर्चना गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, युवक शहराध्यक्ष रोहन शेलार, जिल्हा समन्वयक परवेज शेख, जिल्हा महासचिव इनुस शेख, फारूक रंगरेज, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख आदींच्या सह्या आहेत.

### वंदू गणेशा...



रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर, माणिकचौक, अ.नगर मो.७९७२९८९७८०

# अहिल्यानगर ते अष्टविनायक ७०७ किमी सायकल वारी

## सायकल प्रेमी शरद डोंगरे पाटील, प्रा.बाळासाहेब गायकर व सत्यनारायण पुरोहित यांचा भक्तीमय प्रवास

नगर – गणपती बाप्पाच्या भक्तीने प्रेरित होऊन अहिल्यानगर येथील सायकलप्रेमी शरद डोंगरे, प्रा. बाळासाहेब गायकर आणि सत्यनारायण पुरोहित यांनी अहिल्यानगर ते अष्टविनायक अशी तब्बल ७०७ किलोमीटरची सायकल वारी पूर्ण केली. पाच दिवसांच्या या प्रवासात विविध घाटमार्गांचा सामना करीत तिघांनी अष्टविनायक गणपतींचे दर्शन घेतले. या प्रवासात सुमारे ५२८६ मीटरचे एलिव्हेशन पार करण्यात आले. या सायकल वारीमध्ये तिघांनी मोरगाव येथील मयुरेश्वर, सिद्धटेक येथील सिद्धिविनायक, थेऊर येथील चिंतामणी, लोणावळा व खोपोली मार्गे पाली येथील बल्लाळेश्वर, महड येथील वरदविनायक, माळशेज घाट व गणेशखिंड मार्गे लेण्याद्री येथील गिरिजात्मक, ओझर येथील विघ्नहर्ता आणि रांजणगाव येथील महागणपतीचे दर्शन घेतले.



गणपती बाप्पाच्या भक्तीने प्रेरित होऊन अहिल्यानगर येथील सायकलप्रेमी शरद डोंगरे, प्रा. बाळासाहेब गायकर आणि सत्यनारायण पुरोहित यांनी अहिल्यानगर ते अष्टविनायक अशी तब्बल ७०७ किलोमीटरची सायकल वारी पूर्ण केली.

प्रवासादरम्यान घाटरस्ते, चढ–उतार आणि पावसाचा सामना करीत तिघांनी सायकल वारी पूर्ण केली. प्रत्येक पेडलसोबत गणपती बाप्पाचे नामस्मरण करीत हा प्रवास करण्यात आला. त्यामुळे ही वारी केवळ सायकलचा प्रवास न राहता श्रद्धा, भक्ती, जिद्द, संयम आणि आत्मविश्वासाची अनुभूती देणारी ठरली. प्रवासादरम्यान विविध ठिकाणी मित्रपरिवार तसेच सायकलप्रेमींची भेट झाली. अनेकांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत पुढील प्रवासासाठी स्फूर्ती दिली. या सर्वांच्या सदिच्छांमुळे वारीचा उत्साह अधिक वाढल्याचे तिघांनी सांगितले.

### 'हा प्रवास जिद्दीचा होता'

याबाबत शरद डोंगरे यांनी सांगितले की, हा प्रवास जिद्दीचा होता. गणपती बाप्पाला भेटायचे होते आणि त्याचबरोबर निसर्गरम्य वातावरण एक्सप्लोर करायचे होते. भक्ती, शक्ती आणि निसर्ग जोपासण्याचा संदेश देत सायकलचे महत्त्व सांगत हा प्रवास पूर्णत्वाकडे नेला. सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्य, निसर्ग आणि आनंदाशी जोडणारे माध्यम आहे. त्यामुळे 'देखना है तो कल, तो रोज चलाओ सायकल' असा संदेश देत त्यांनी सायकलप्रेमाचा जागर केला.

गणपती बाप्पाच्या कृपेने ही ७०७ किलोमीटरची सायकल वारी सुखरूप पूर्ण झाली. अष्टविनायकांच्या चरणी सायकलने पोहोचण्याचा हा अनुभव अविस्मरणीय ठरला असून, भक्ती आणि सायकलप्रेमाचा अनोखा संगम या वारीत अनुभवता आल्याची भावना शरद डोंगरे, प्रा. बाळासाहेब गायकर आणि सत्यनारायण पुरोहित यांनी व्यक्त केली.

# अविष्कारमध्ये बाणेश्वरचे १३ विद्यार्थी झोनल स्तरावर



नगर – श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहिल्यानगर येथे अविष्कार संशोधन कार्यशाळा, संशोधन स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पाची संकल्पना, प्रकल्पाची निवड, संशोधन प्रक्रिया, प्रकल्पाची मांडणी तसेच प्रभावी सादरीकरण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची जिज्ञासा निर्माण होऊन त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना योग्य दिशा मिळाली.

या कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. डॉ. सोनवणे मॅडम यांनी कार्यशाळेचे नियोजन व समन्वय प्रभावीपणे केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना अविष्कार स्पर्धेसाठी संशोधन प्रकल्प तयार करण्यास तसेच आत्मविश्वासाने सादरीकरण करण्यास मोठी मदत झाली.


अविष्कार संशोधन स्पर्धेत एकूण ६ कॅटेगरींमध्ये विद्यार्थ्यांनी २६ संशोधन प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांचे परीक्षण करण्यासाठी डॉ. मुळे बी. एम. सर, डॉ. शेख आर. एच., डॉ. वाघ मॅडम आणि डॉ. दिवटे मॅडम यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचे विविध निकषांच्या आधारे परीक्षण करून गुणांकन केले. त्यानुसार विजेत्या प्रकल्पांची निवड करण्यात आली. परीक्षकांच्या निष्पक्ष परीक्षणामुळे स्पर्धेला योग्य दिशा मिळाली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. व्ही. एम. जाधव यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेत महाविद्यालयातील १३ विद्यार्थ्यांची झोनल (विभागीय) स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली.

श्री बाणेश्वर संस्थेचे अध्यक्ष आमदार अक्षदा कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रमुख पाहुणे, प्राचार्य तसेच प्राध्यापकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत यश





नगर – तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ऑर्किड इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडलेल्या तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत चमकदार कामगिरी केली.

चौदा वर्षांखालील मुलांच्या गटात विद्यालयाच्या प्रणव बोरूडे व अंगद काळे यांनी अनुक्रमे पाचवा व सहावा क्रमांक पटकाविला. स्पर्धेत एकूण ५१ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

प्रणव बोरूडे याची जिल्हा स्तरीय बुद्धिबळ स्पधसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका सौ. जयश्री खरात यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून या विद्यार्थ्यांना किशोर उबाळे व मुजाहिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.





प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे १६ सप्टेंबर रोजी श्री गणेशाच्या मंगलमय आरतीचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य महेश भालसिंग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणरायाची आरती.

# 'दि महाराष्ट्र स्टेट हाउसिंग फायनान्स'ची २८ सप्टेंबरला वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि. मुंबई या संस्थेची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता हॉटेल जसराज पॅलेस, आयटीआय कॉलेजजवळ, धामणगांव रोड, यवतमाळ ४४५००१ येथे होणार आहे.

या सभेची नोटीस सर्व सभासदांना पोस्टाने रवाना करण्यात आलेली असून सन २०२५–२०२६ चा वार्षिक अहवाल प्रधान कार्यालय व सर्व जिल्हा कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे आणि सभासदांसाठी सर्व जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहे.

# स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा

## १५०० विद्यार्थ्यांच्या भव्य स्वच्छता रॅलीने अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे शहरात 'सेवा संकल्प अभियाना'चा शुभारंभ

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे औचित्य साधून, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' व 'स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमाचा शुभारंभ रेसिडेन्शिअल हायस्कूल येथे येथे करण्यात आला. १५०० विद्यार्थ्यांनी काढलेल्या दोन किलोमीटर लांबीच्या भव्य स्वच्छता रॅलीने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. ढोल–ताशांचा निनाद, विद्यार्थ्यांच्या घोषणा आणि हातातील फलक या माध्यमातून शहरात स्वच्छतेच्या संकल्पाबाबत जनजागृती करण्यात आली. 'स्वच्छता ही केवळ मोहीम नाही, तर ती आपल्या दैनंदिन जीवनातील संस्कार आणि जबाबदारी आहे,' स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले. तर, स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून व्हायला हवी, असे सांगत या अभियानात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

संपूर्ण महाराष्ट्रात हे 'सेवा संकल्प अभियान' १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रमांसह राबविले जाणार आहे. अहिल्यानगर शहरात महानगरपालिकेच्या वतीने या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक महेश लोंढे, स्वच्छतादूत डॉ. अमोल बागुल, मुख्य लेखा परीक्षक गणेश लयचेट्टी, रेसिडेन्शिअल हायस्कूलचे प्राचार्य श्री. जाधव आणि पर्यावरणदूत सुरेश खामकर, श्री. पालीवाल आदी उपस्थित होते. या रॅलीमध्ये राष्ट्रीय हरित सेना, इको क्लब, मिशन लाइफ, एनसीसी, समाजसेवा तसेच स्काऊट–गाईडचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य जाधव यांनी प्रास्ताविकातून 'सेवा संकल्प अभियान' आणि स्वच्छता पंधरवड्यांतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

महापौर ज्योतीताई गाडे यांनीही स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे महत्त्व पटवून देताना त्यांनी विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच दैनंदिन स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याचे आणि या मोहिमेतून 'स्वच्छतेची संस्कृती' निर्माण करण्याचा निर्धार करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे 'शंभर दिवसांच्या स्वच्छता संकल्पाची' शपथ घेतली आणि स्वच्छ परिसर, स्वच्छ शाळा व स्वच्छ शहरासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याचा दृढ निर्धार व्यक्त केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे औचित्य साधून, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' व 'स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमाचा शुभारंभ रेसिडेन्शिअल हायस्कूल येथे येथे करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, स्वच्छता ही प्रत्येकाच्या जीवनातील महत्त्वाची संस्कारमूल्ये असल्याचे स्पष्ट केले. घर, शाळा तसेच सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करत 'स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून झाली पाहिजे' हा संदेश त्यांनी दिला. स्वच्छता ही सेवा अभियानात महानगरपालिकेमार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांनी यावेळी दिली.

स्वच्छता ही सेवा अभियानात १७ सप्टेंबर रोजी अभियानास शुभारंभ होऊन स्वच्छता अभियान, स्वच्छता शपथ आणि जनजागृती रॅली काढण्यात आली. १७ ते १८ सप्टेंबर दरम्यान स्वच्छता ज्ञान यात्रा व स्वच्छ पाठशाला उपक्रमांतर्गत शाळांमध्ये चार प्रकारच्या कचरा वर्गीकरणाबाबत मार्गदर्शन, तसेच विद्यार्थी व युवकांच्या कंपोस्ट प्लांट, एमआरएफ, आरआरआर सेंटर व एसडब्लूएम सुविधांना अभ्यासभेटी आयोजित केल्या जातील. १९ सप्टेंबरला प्रभागनिहाय घाण साचणारी ठिकाणे ओळखणे, नकाशांकन व जिओ–टॅगिंग करणे, २० सप्टेंबर रोजी विशेष स्वच्छता, कचरा व डेब्रिज हटविणे, सौदर्यीकरण व कामांचे 'आधी–नंतर' छायाचित्रण, २१ सप्टेंबरला सार्वजनिक ठिकाणे जसे बसस्थानक, रेल्वे परिसर, बाजारपेठा, उद्याने व गर्दीच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम, २२ सप्टेंबरला बाजारपेठ स्वच्छतेअंतर्गत व्यापारी व नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरण, प्लास्टिकमुक्त बाजार व कचरा न टाकण्याबाबत जनजागृती, २३ सप्टेंबर रोजी जनसहभाग जनजागृती अंतर्गत घराघरात जनजागृती, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, चार प्रकारचे वर्गीकरण व घरगुती कंपोस्टिंग याबाबत माहिती देणे, २५ सप्टेंबरला स्वच्छ पर्व – गणेशोत्सव स्वच्छतेत निर्माल्य संकलन, पर्यावरणपूरक उत्सव, प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव व विसर्जनस्थळ स्वच्छता मोहीम, २६ सप्टेंबर रोजी 'स्पोर्ट्स फॉर स्वच्छता' अंतर्गत स्वच्छता विषयक क्रीडा स्पर्धा, स्वच्छता रन व कार्यक्रमानंतर स्वच्छता, २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिनानिमित्त ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांची स्वच्छता मोहीम, २८ ते २९ सप्टेंबर दरम्यान 'कबाड से जुगाड' या उपक्रमात टाकाऊ वस्तूंपासून उपयोगी वस्तू तयार करण्याच्या स्पर्धा, ३० सप्टेंबरला सफाईमित्र सुरक्षा व सन्मान शिबिरांतर्गत कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन, सुरक्षा प्रशिक्षण, कल्याणकारी योजनांची माहिती व सत्कार, १ ऑक्टोबर रोजी 'एक दिवस, एक तास, एकत्र' या उपक्रमात सामूहिक श्रमदान, कचरा साचणाऱ्या ठिकाणी स्वच्छता नागरिक सहभागातून होणार, २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत दिवसानिमित्त स्वच्छता शपथ, उत्कृष्ट कामगिरीचा गौरव व वृक्षारोपण उपक्रमांचे आयोजन आदी कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# बाणेश्वर क्रीडा मंडळाच्या गणपतीची प्राणप्रतिष्ठा



बुऱ्हाणनगर येथील बाणेश्वर क्रीडा मंडळाच्या गणपतीची प्रतिष्ठापना आ.अक्षय कर्डिले यांच्या हस्ते होऊन आरती करण्यात आली. याप्रसंगी क्रीडा मंडळाचे पदाधिकारी, वारूळवाडी, बुऱ्हाणनगर गावचे सरपंच, कार्यकर्ते. (छाया – विजय मते)

नगर – बुऱ्हाणनगर येथील येथील बाणेश्वर क्रीडा मंडळाच्या गणपतीची आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी राज्य क्रीडा खो–खो मार्गदर्शक संतोष वाबळे सपत्नीक आरतीसाठी उपस्थित होते.

याप्रसंगी बाणेश्वर क्रीडा मंडळातील खेळाडूंनी लेझीमचे नेत्रदीपक प्रात्यक्षिक सादर केले. जुन्या परंपरागत खेळांना उभारी देण्यासाठी आणि पारंपारिक क्रीडा प्रकारांचे जतन व्हावे या हेतूने हे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यावेळी पै.संदीप कर्डिले, बुऱ्हाणनगरचे सरपंच रावसाहेब कर्डिले, वारुळवाडीचे सरपंच सागर कर्डिले, उद्योजक रवी कर्डिले, जयराम वाघ, कृ.उ.बा. समिती संचालक दत्ता तापकिरे, धर्मा जाधव यांनी लेझीम सरावासाठी सहकार्य केले.

आगडगाव श्री क्षेत्र काळभैरवनाथ देवस्थान चे अध्यक्ष बलभीम कराळे, ज्ञानदेव जाधव, बाणेश्वर चेमटे, गोवर्धन मोरे, साईराज चेमटे यांचे देखील सहकार्य लाभले.

आ. अक्षय कर्डिले यांनी बाणेश्वर क्रीडा मंडळातील सर्व मुले–मुलीं चे मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी, गणेश वारुळे, रामेश्वर चेमटे, सुधीर दुसुंगे, खेळाडू, ग्रामस्थ उपस्थित होते.

# इंडिया तायक्वांदो व कुकिऑन ब्लॅक बेल्ट परीक्षा उत्साहात




तायक्वांदो स्पोर्टस् असोसिएशन व एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने भूषणनगर केडगाव या ठिकाणी इंडिया तायक्वांदो व कुकिऑन ब्लॅक बेल्ट परीक्षेमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांसह प्रशिक्षक आदी. (छाया – अमित मन्यार)

नगर – इंडिया तायक्वांदो मान्यतेने व महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनच्या अंतर्गत तायक्वांदो स्पोर्टस् असोसिएशन व एकलव्य तायक्वांदो अकॅडमी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आर एम टी बिझनेस सेंटर झेंडा चौक भूषणनगर केडगाव अहिल्यानगर या ठिकाणी इंडिया तायक्वांदो व कुकिऑन ब्लॅक बेल्ट परीक्षा १३ सप्टेंबर रोजी झाल्या. या परीक्षेत एक्झामिनर म्हणून राष्ट्रीय पंच क्युरोगी/पूमसे तेजकांत बोनगाडे यांचा मार्गदर्शनात ब्लॅकबेल्ट परीक्षा घेण्यात आले.

ब्लॅक बेल्ट परीक्षार्थी – हर्षदा लोळगे, धनश्री जपकर, तनवी आवारी, आरती बांगर, सक्षम येणारे, समर्थ टकले, हर्षल कोतकर, हर्षदा हजारे, राहुल पोपळघट, ज्ञानेश्वरी दळवी, श्रद्धा गायकवाड, अमित लोंढे, पियुष सहानी, चंद्रकांत बिरारे, ओंकार पवार, नैतिक मगर, प्रांजल जगताप आदि परिक्षार्थीनी आपला सहभाग नोंदवला या सर्व परीक्षार्थी खेळाडूंचे तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओबासे, उपाध्यक्ष –घनश्याम सानप, महासचिव गफ्फार पठाण, कोषाध्यक्ष–प्रसाद कुलकर्णी यांनी खेळाडूला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आर.एम टी. बिझनेस सेंटरचे चेअरमन मनीष ठुबे यांनी सुद्धा खेळाडूचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ मार्गदर्शक अल्ताफ खान, तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन व एकलव्य तायक्वांदो अक्डमी चे सचिव गणेश वंजारे, प्रशिक्षक सचिन कोतकर, योगेश बिचितकर, मंगेश आहेर, सचिन मरकड यांनी अभिनंदन केले.

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**

**शिष्य पाहिजे परमशुद्ध। शिष्य पाहिजे परमसावध। शिष्य पाहिजे अगाध। उत्तम गुणाची।।**



## दिनविशेष १८ सप्टेंबर

५३: ५३ई.पूर्व : ट्राजान रोमन सम्राट यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट ११७)१७०९: सॅम्युअल जॉन्सनफ ब्रिटिश साहित्यिक, टीकाकार, व विचारवंत यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १७८४)१९००: शिवसागर रामगुलाम मॉरिशसचे पहिले प्रधानमंत्री यांचा जन्म. (मृत्यू: १५ डिसेंबर १९८५)१९०५: ग्रेटा गार्बो हॉलीवूड अभिनेत्री यांचा जन्म. (मृत्यू: १५ एप्रिल १९९०)१९०६: प्रभूलाल गर्ग हिन्दी हास्यकवी यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर १९९५ हाथरस, उत्तर प्रदेश)१९१२: राजा नेने चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक यांचा जन्म. (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७५)१९४५: जॉन मॅक्फि मॅक्फि चे संस्थापक यांचा जन्म.१९५०: शबाना आझमी भारतीय अभिनेत्री यांचा जन्म.१९५०: विष्णुवर्धन भारतीय अभिनेते यांचा जन्म. (मृत्यू: ३० डिसेंबर २००९)१९६८: उपेंद्र राव भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि राजकारणी यांचा जन्म. १९७१: लान्स आर्मस्ट्राँग अमेरिकन सायक्लिस्ट यांचा जन्म.१९८९: अश्विनी पोनप्पा भारतीय बॅडमिंटनपटू यांचा जन्म. मृत्यू :१७८३: लिओनार्ड ऑयलर स्विस गणितज्ञ यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १७०७) १९९२: मुहम्मद हिदायतुल्लाह भारताचे सहावे उपराष्ट्रपती यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९०५ लखनौ, उत्तर प्रदेश)१९९३: असित सेनफ विनोदी अभिनेते व दिग्दर्शक यांचे निधन.१९९५: प्रभूलाल गर्ग हिन्दी हास्यकवी, पद्मश्री यांचे निधन. (जन्म: १८ सप्टेंबर १९०६) १९९९: अरुण वासुदेव कर्नाटकी मराठी चित्रपट दिग्दर्शक यांचे निधन.२००२: शिवाजी सावंत साहित्यिक यांचे निधन. (जन्म: ३१ ऑगस्ट १९४०) २००४: डॉ. भालचंद्र दिनकर फडके दलित साहित्याचे समीक्षक यांचे निधन.२०१३: वेलियाम भरगवण भारतीय राजकारणी यांचे निधन.


१८१०: चिली देशाला स्पेनपासून स्वातंत्र्य मिळाले.

१८८२: पॅसिफिक स्टॉक एक्सचेंजची सुरूवात झाली.

१८८५: कॅनडातील मॉंट्रिअल शहरात कांजिण्यांची लस घेणे सक्तीचे केल्याने शहरात दंगली उसळल्या.

१९१९: नेदरलंड देशामध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला.१९२४: गांधीजींचे हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी २१ दिवसांचे उपोषण सुरू.१९२७: महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना.१९४७: अमेरिकन गुप्तचर संघटना सी. आय. ए. () ची स्थापना.१९४८: निझामाच्या सैन्याने पराभव स्वीकारल्यामुळे ऑपरेशन पोलो स्थगित करण्यात आले.१९६०: फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या शिष्टमंडळचे प्रमुख म्हणून संयुक्त राष्ट्रात आले. १९६२: बुरुंडी, जमैका, र्‍वांडा आणि त्रिनीदाद व टोबॅगो यांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.१९९७: महाराष्ट्रात कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना.१९९९: साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर.२००२: दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) आपापसातील लाथाडी
५) क्षुद्र, हलकट
९) पर्वताची तुटलेली सुळका
१०) समज नसलेला (हिं.)
१२) गोड, रुचकर
१३) ठोसा, गुद्दा
१५) सुटसुटीत दाण्याचा
१६) विड्याची पाने कापण्याचे हत्यार १८) आरी चा आवाज
१९) कथ्था २०) रसभरीत
२२) मिलिंद, मधुकर
२४) कानात सांगावयाची अक्षरे
२५) विष्णुपत्नी
२६) नवी पालवी, तरुणी
२९) लहान मडके
३१) शाळेतील एक विषय
३२) सोपे
३३) एका गायिकेचे नाव
३६) दुराग्रह
३७) फाटणे, निघणे
३८) राजाचा पुत्र
४१) हल्ला, दिवस
४३) रडगाणे
४४) सीतापती
४५) नवऱ्याची बहिण
४७) उत्सवाचे दिवस
५१) परिमल, राहणे
५३) जमिनीवर राहणारे
५४) एक फूल दो माली या चित्रपटाचा हिरो
५७) कामगार
५८) एक चहा कंपनी
५९) सुंदर, रमविणारे
६०) दया
६१) एक खाद्यपदार्थ

### उभे संकेत

१) देखणेपणा, रम्य
२) एक प्रकारचे पट्ट्या पट्ट्याचे कापड
३) पडदा
४) गायनसम्राज्ञीचे पिता
५) सूर्य
६) श्वास, ताकद
७) भुंगा, मिलिंद
८) हंटर ११) दरवाजा
१४) एक चार चाकी वाहन
१७) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र
२१) पैसा
२३) छत्रपती शिवाजीचा राज्यभिषेक कर्ता
२६) कैफ, धुंद
२७) वस्त्र चोरणे
२८) सासरी होत असलेले छळ
३०) बाजू, दिक
३४) सापाची एक जात
३५) धाक, जरब
३९) जुळवाजुळव
४०) आपला एक अवयव
४२) युद्धभूमि ४६) औषधी
४८) वाचणारा
४९) पुन्हा पुन्हा तेच
५०) पाखरांचा आवाज
५२) एक चपळ प्राणी
५४) विटिदांडूच्या खेळातील एक संज्ञा ५५) लांबत जाणारा स्वर, द्वेष, घुस्सा
५६) शांत वातावरण
५७) विश्वास, भाव, निष्ठा

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ड | वा | ज | णे | | श | द्व | सं | प | त्ती | | आ |
| तु | म | स | री | | वा | क्य | | थ | र | | बा | ग |
| र | ड | णे | | स | म | तो | ल | | म | का | | म |
| | म | | सं | | कु | व | त | | वी | रा | स | न |
| च | | | प्र | | क्षी | र | | ग | र | | बं | |
| प | सा | य | दा | न | | | | | च | क्र | ध | र |
| ला | | म | य | स | भा | | | च | क्र | म | | ण |
| कं | च | न | | | न | म | स्का | र | | वा | व | र |
| ठी | | क | ट | | ग | र | | च | क्क | र | | ण |
| | क | ल्या | ण | ग | ड | | बा | री | | | ब | |
| | ट | ण | ट | ण | | त | रा | त | रा | | ल | व |
| चे | व | | ण | | मे | | ख | | गि | री | रा | ज |
| क | णी | स | | चु | ण | ख | डी | | ट | | म | न |





| देश | - | राजधानी |
|---|---|---|
| अफगाणिस्तान | - | काबूल |
| अल्जेनिया | - | अल्जीअर्स |
| अंगोला | - | लुगांडा |
| बेनिन | - | पोर्टिनोव्हो |
| बोटस्वाना | - | गॉबोरन |
| बुरिडी | - | बुजुंबरा |
| कॅमेरुन | - | यावदे |
| मादागास्कर | - | तानानाव्हीरे |
| मालावी | - | लिलोंगवे |
| माली | - | बमावेल |
| मॉरिटेनीया | - | नौकाचिट |
| मॉरिशस | - | पोर्टलुई |
| मोरोक्को | - | राबात |
| केपवर्देबर्द्रे | - | प्राया |
| प्रजासत्ताक | - | वनगुई |
| चाड | - | एन. जामेने |
| कामोरोबेट | - | मोरीनी |
| जीबुती | - | जीबुती |
| कांगो | - | ब्राझीव्हीले |
| गॉबीया | - | बाजुला |
| घाना | - | आक्रा |
| गीनीया | - | कोनाक्रे |
| बिसाबू | - | बिसाबू |
| आयव्हरीकोस्ट | - | अंबीजान |
| केनिया | - | नैरोबी |
| लेसिथी | - | मसरे |
| लायबेरीया | - | मनोव्हीया |
| लिबीया | - | लिंपोली |
| सुदान | - | खार्टुम |
| स्माझीलंड | - | म्बाबाने |
| टोगो | - | लोमे |
| युगांडा | - | कंपाला |
| झैरे | - | किंगन्शा |
| ॲन्टीग्यू | - | सेंट जॉन |
| बहामा | - | नसावू |
| बेलीझे | - | बेलमोपॅम |
| बोलिव्हीया | - | लापाझ |
| कॅनडा | - | ओटावा |
| चिली | - | सेंटीयागो |
| कोस्टारिया | - | सॅनजोसेफ |
| डोसिनीका | - | रोश्येयू |
| इक्वेडोर | - | क्वीटो |
| फॉकलंड | - | स्टॅनले |
| गॅनाडा | - | सेंटजॉर्जस |
| ग्वाटेमाला | - | ग्वाटेमाला |
| हैती | - | पोर्ट-जे-प्रिन्स |
| मॅक्सीको | - | मॅक्सीको सिटी |
| मोझांबीक | - | मापुरी |
| नायगर | - | नायमे |
| नायजेरीया | - | लाओस |
| रियुनियन | - | सेंट डेनिस |
| झिम्बाम्वे | - | साल्सबरी |
| रुवांडा | - | किगली |
| सहारा प. | - | अलुअसून |
| सेंट होग्नो | - | जेम्स टाऊन |
| सावितामे व प्रिन्सेव्ह | - | साओतोमे |
| सेनेगल | - | डाकार |
| सेचेलीस | - | व्हिक्टोरिया |
| सियरा-लिओने | - | प्रिटाऊन |
| सोमालिया | - | मोगादिसू |
| दक्षिण आफ्रिका | - | केपटाऊन |
| द. प. आफ्रिका | - | प्रिटोरिया |
| नामेबिया | - | विडहॉथ |
| टांझानीया | - | दारेसलाम |
| ट्युनिसीया | - | ट्युनिस |
| असरहोल्टा | - | औगाजेगाऊ |
| झांबीया | - | लुसाका |
| अर्जेंटिना | - | ब्युनोसआयर्स |
| बार्बाडोस | - | ब्रिजटाऊन |
| बम्युज | - | हॅमिल्टन |
| ब्राझील | - | ब्राझिलिया |
| कॅमनबेटे | - | जॉर्जटाऊन |
| कोलंबिया | - | बोगोटे |
| क्युबा | - | हॅवाना |
| होमिनिकन | - | सॅन्ट्रोडोमीनगो |
| एल. साल्व्हाडोर | - | सॅन साल्व्हाडोर |
| फ्रेच गियान | - | केन्ये |
| गुडेम्लप | - | बॉसटेरे |
| गियाना | - | जॉर्ज टाऊन |
| मार्टिनेक्यू | - | फोर्ड डी फ्रान्स |
| मॉटेररेंट | - | प्लायमाऊठ |
| नेदरलँड ऑंटीलिथ | - | विल्यमस्टँड |
| पनामा | - | पनामा |
| पॅराग्वे | - | ॲसेशन |
| पोर्टीरिको | - | सॅनज्युऑन |
| सेंट व्हिन्सेट | - | काग्ज टाऊन |
| सेट लुसिया | - | कॅस ट्रिज |

उर्वरित पुढच्या अंकात..

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन् २००३ में बनी इस फिल्म में अक्षय कुमार, लारा दत्ता और प्रियंका चोप्रा थे.
३) XXX पांचोली (नायक)
७) सन् २००३ में बनी फिल्म फुटपाथ के संगीतकार.
८) सन् १९९५ में रमेश सिप्पी के निर्देशन में बनी इस फिल्म में शाहरुख खान और रविना टंडन थे.
१०) किंग अंकल इस फिल्म का खलनायक.
१३) बिपाशा XX (नायीका)
१४) अमिताभ बच्चन, हेमा मालिनी, प्राण, सारीका और अमजद खान अभिनीत फिल्म.
१६) शशिलाल XXX (निर्देशक)
१७) आशा इस फिल्म की नायीका.
२०) खुन XXX (फिल्म)
२१) करीश्मा कपूर के अभिनेता दादाजी.
२४) XXX कौन (फिल्म)
२५) सन् १९९६ में निर्देशक जगदीश ए. शर्मा की इस फिल्म में अक्षय कुमार, करीश्मा कपूर, सुनील शेट्टी और सोनाली बेंद्रे थे.
२७) सन् १९८५ में बनी फिल्म मर्द के निर्देशक.
३०) सन् १९९८ में बनी फिल्म विनाशक की नायीका. (सिर्फ नाम)
३१) जैकी श्रॉफ, पुनम ढिल्लो और अमरीश पुरी अभिनीत फिल्म.

### उभे संकेत

१) सन् १९९४ में निर्देशक राजकुमार संतोषी की इस फिल्म म आमिर खान, सलमान खान, रवीना टंडन और करीश्मा कपूर थे.
२) गंगा XXXX सरस्वती (फिल्म)
४) इस फिल्म में अजय देवगन, अक्षय खन्ना और उर्मिला मातोंडकर थे.
५) सनी देओल, अनिल कपूर और श्रीदेवी अभिनीत फिल्म.
६) XXX को आने दो (फिल्म)
९) सन् १९९९ में सनी देओल के निर्देशन में बनी इस फिल्म में सनी देओल, बॉबी देओल और उर्मिला मातोंडकर थे.
११) मकडी इस फिल्म की नायीका.
१२) दिल का क्या XXX (फिल्म)
१५) सन् २००३ में बनी फिल्म मै प्रेम की दिवानी हूं की नायीका.
१८) संजय दत्त अभिनीत बतौर हिरो पहली फिल्म.
१९) दिव्या XXX (नायीका)
२२) इंसाफ का XXX (फिल्म)
२३) अमरीश पुरी के खलनायक भाई.
२६) एक मशहूर गीतकार.
२८) XXX के सामने (फिल्म)
२९) बलराज XXX (नायक)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | म | ज | द | खा | न | | | ना | | जो | | |
| मि | | ल | | न | | क | हो | ना | प्या | र | है | |
| ता | | | दा | | | | ते | | र | | रा | ज |
| भ | ट | ना | ग | र | | | हो | | झू | | न | |
| ब | | | द | | च | ल | ते | | क | म | | |
| द्य | | | फ्र | स | ले | | प्या | | ता | | चा | |
| न | | ज | य | | | अ | र | मा | न | को | ह | ली |
| | खा | ति | र | | बा | | हो | | ही | | त | |
| ग | | न | | | सु | हा | ग | न | | | | त |
| ह | | ल | गा | न | | | या | | | | दि | नु |
| री | | ली | | ज | मा | ने | | श्या | | पा | | जा |
| चा | | त | | रा | | | रा | म | गो | पा | ल | |
| ल | | | टि | ना | मु | नी | म | | पी | | व्ह | |

### विनोद



एकदा एका महिलेने काही ठराविक व्यक्तींना जेवणाचे आमंत्रण दिले. जेवणाची सर्व तयारी झाली. तिने हात पुसायच्या सर्व टॉवेलांवर चिठ्ठी लावली की, 'खबरदार हा टॉवेल वापराल तर।'
खरं म्हणजे तिने हे आपल्या नवऱ्यासाठी लिहिले होते. पण पाहुण्यांच्या घाईगर्दीत त्या चिठ्ठ्या काढून टाकायला ती विसरली. पाहुणे निघून गेल्यावर तिच्या लक्षात आलं की, टॉवेल जसेच्या तसे होते. त्यांचा कोणीच वापर केला नव्हता.

---

एका दारुच्या दुकानात अशी पाटी टांगण्यात आली होती की, ''जर तुम्ही तुमचे दु:ख विसरण्यासाठी दारु पीत असाल, तर मेहरबानी करुन प्रथम दारुचे पैसे चुकते करा.''

### चारोळी

मी अगदीच बोलकी
तू खूप अबोल आहे
राजा तुझा रुसवा
मला अगदीच कबूल आहे.

# श्री गणेश महापुराण कथाला पहिल्याच दिवशी भाविकांचा भक्तिसागर

## स्वामी इंद्रदेवेश्वरानंदजी महाराजांच्या अमृतवाणीने बंधन लॉन्स दुमदुमला; सात दिवस रंगणार भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांचा जागर; २२ सप्टेंबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ५ वाजता कथा

नगर – 'गणपती बाप्पा मोरया', 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने, भक्तिगीतांच्या स्वरांनी आणि अध्यात्माच्या वातावरणाने बुधवारी सावेडीतील बंधन लॉन्सचा परिसर अक्षरशः भक्तिमय झाला. गणरायाच्या भक्तीत तल्लीन झालेल्या हजारो भाविकांच्या उपस्थितीत पवार–पाटील परिवाराच्या वतीने आयोजित श्री गणेश महापुराण कथेचा भव्य व संगीतमय शुभारंभ करण्यात आला. पहिल्याच दिवशी भाविकांनी उपस्थिती लावत बंधन लॉन्समध्ये जणू भक्तीचा महासागरच निर्माण केला.





युगप्रवर्तक राष्ट्रीय संत महामंडलेश्वर स्वामी डॉ. इंद्रदेवेश्वरानंद सरस्वतीजी महाराज यांच्या अमृतवाणीतील श्री गणेश महापुराण कथनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. गणरायाची महती, भक्तीचे महत्त्व, अध्यात्मिक संस्कार आणि जीवनातील सदाचार यांचा संदेश देत महाराजांनी भाविकांना भक्तीमय वातावरणात चिंतनाची अनुभूती दिली.

कथेच्या प्रारंभापासूनच भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कथा, भजन, भक्तिगीते आणि महाराजांच्या ओजस्वी वाणीतून व्यक्त होणाऱ्या अध्यात्मिक विचारांमुळे उपस्थित भाविक भक्तिरसात तल्लीन झाले.

श्री गणेश महापुराण हा केवळ धार्मिक कथाकथनाचा कार्यक्रम नसून गणरायाच्या माध्यमातून भक्ती, संस्कार, अध्यात्म आणि मानवतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविणारा आध्यात्मिक उपक्रम आहे. पहिल्याच दिवशी झालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे या सोहळ्याची भव्यता प्रकर्षाने जाणवली.

कथा ऐकण्यासाठी शहरासह परिसरातील विविध भागांतून भाविक बंधन लॉन्समध्ये दाखल झाले. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच तरुणांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. भाविकांनी शांतपणे कथा श्रवण करत महाराजांच्या विचारांचा लाभ घेतला. गणरायाच्या नामस्मरणाने आणि भक्तीच्या वातावरणाने उपस्थितांच्या मनाला प्रसन्नतेची अनुभूती मिळाली.

स्वामी इंद्रदेवेश्वरानंदजी महाराज यांच्या कार्याची व्याप्ती आध्यात्मिक प्रवचनापुरती मर्यादित नसून मानवसेवेच्या विविध उपक्रमांपर्यंत विस्तारलेली आहे. गरजू नागरिकांना नैसर्गिक चिकित्सा व नि:शुल्क औषधोपचाराच्या माध्यमातून मदत करण्यात आली आहे. तसेच वृद्ध, साधू–संत आणि बेसहारा कुटुंबांच्या मदतीसाठी आवश्यक साहित्य, मास्क, सॅनिटायझर आणि इतर गरजेच्या वस्तूंचे वितरण करण्यात आले.

कोविड काळात समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत विविध सेवा उपक्रम राबविण्यात आले. संकटकाळात समाजाच्या पाठीशी उभे राहणे आणि मानवतेची सेवा करणे हा अध्यात्माचा महत्त्वाचा भाग असल्याचा संदेश त्यांच्या कार्यातून देण्यात आला.

मानवसेवा, आध्यात्मिक जागृती आणि समाजोपयोगी कार्याची दखल घेत The American University for Global Peace (USA) यांच्याकडून स्वामी इंद्रदेवेश्वरानंदजी महाराजांना ८ मे २०२४ रोजी "Doctor of Philosophy - Humanity Spiritual Education' ही उपाधी प्रदान करण्यात आली आहे.

मानवसेवा आणि आध्यात्मिक शिक्षणाच्या क्षेत्रातील कार्याबद्दल मिळालेला हा आंतरराष्ट्रीय सन्मान त्यांच्या अनुयायांसाठी विशेष अभिमानाचा विषय ठरला आहे. सेवा, साधना, त्याग आणि अध्यात्म या मूल्यांच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून अधोरेखित होतो.

'सेवा हीच खरी साधना आहे. जो दुःखीच्या दुःखात सहभागी होतो, तोच खरा संत' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविताना मानवतेला केंद्रस्थानी ठेवण्याचे आवाहन करण्यात येते. अध्यात्म म्हणजे केवळ पूजा–अर्चा नसून समाजातील गरजू व्यक्तीच्या मदतीला धावून जाणे, दुःखी व्यक्तीच्या वेदना समजून घेणे आणि मानवकल्याणासाठी योगदान देणे, असा व्यापक विचार या सेवाकार्यातून मांडला जातो.

गणेश महापुराणाच्या माध्यमातूनही भक्तीबरोबरच संस्कार, कुटुंबव्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविला जात आहे.

सावेडीतील बंधन लॉन्स येथे सुरू झालेला हा आध्यात्मिक सोहळा १६ ते २२ सप्टेंबर या कालावधीत दररोज आयोजित करण्यात आला आहे. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत श्री गणेश महापुराण कथा होणार आहे.

या सात दिवसांच्या कालावधीत गणेशभक्तांना गणरायाच्या महिमेचे श्रवण करण्यासोबतच आध्यात्मिक विचार, भक्ती आणि संस्कारांचा लाभ घेता येणार आहे. कथेचे 'ओलीव्ह संतवाणी' टीव्ही चॅनलवर थेट प्रक्षेपण करण्यात येत आहे.

श्री गणेश महापुराणाच्या सांगता सोहळ्यानिमित्त २२ सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशीही भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

गणरायाच्या भक्तीचा हा भव्य सोहळा अहिल्यानगरकरांसाठी आध्यात्मिक पर्व ठरत असून, शहरातील तसेच परिसरातील गणेशभक्तांनी कुटुंबासह उपस्थित राहून श्री गणेश महापुराण कथेचा आणि महाराजांच्या अमृतवाणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

गणरायाच्या भक्तीने सुरू झालेला हा सोहळा केवळ सात दिवसांचा धार्मिक कार्यक्रम न राहता भक्ती, अध्यात्म, संस्कार आणि मानवसेवेचा संदेश देणारा उपक्रम ठरत आहे. पहिल्याच दिवशी भाविकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता बंधन लॉन्समध्ये पुढील दिवसांतही भक्तांची मोठी गर्दी होण्याची चिन्हे आहेत. गणरायाच्या नामघोषाने सुरू झालेला हा भक्तीचा जागर २२ सप्टेंबरपर्यंत अहिल्यानगरच्या वातावरणात अध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणार आहे.



## गुरुवाणी – ५३
### 'बंध' तत्वाचे रहस्य...

नऊ तत्वात 'बंध' तत्व असते. जसा बंध होईल तसे आयुष्य मिळेल. असा बंध झाला पाहिजे की परत त्यातून नवीन बंध निर्माण झाला नाही पाहिजे. असे करणारे मोक्ष गतीकडे वाटचाल करतात. आश्रव, संवर मन वचन कायेद्वारे होतो. बंध 'कषाय'मुळे होतो. क्रोध, अहंकार, माया, लोभ यामुळे बंध होतो. तुमच्याकडे नौकषाय नसतील तर कषाय होणारच नाही. कषायमधील स्त्री वेद, पुरूष वेद आणि नपुंसक वेद नसतील तर कषाय होणार नाही. दुर्दैवाने आज सगळीकडे या तीन वेदाचाच खेळ चालू आहे. मर्दानगी, सुंदरता याचे आकर्षण निर्माण केले जाते. पुरूषांच्या बनियनच्या जाहिरातीत महिलेचे काय काम असते? पण जाहिरातींचे विश्व नौकषायवरच चालते. कारण हे बंद झाले तर कोणतेच उत्पादन मार्केट मध्ये चालणार नाही. जाहिरातीतून तुम्हाला आकर्षित केले जाते. रति, अरति हे सुद्धा नौकषायमध्ये येतात. लाईक, डिसलाईक. हे माझे आवडते, ते माझे नावडते. तुम्ही हे दोन्ही सोडून दिले तर अहंकारही मनाला शिवणार नाही, भांडण होणार नाही आणि क्रोधही येणार नाही. तुम्हाला कोणी लाईक केलं तर आनंद होतो. कोणी डिसलाईक केले तर राग येतो. म्हणूनच सगळ्या तपात ब्रम्हचर्य तपाला श्रेष्ठ म्हणतात. ब्रम्हचर्य म्हणजे आसक्ती मुक्ती. एखाद्या

कवी, नाचणाऱ्याला, गायकाला तुम्ही प्रतिसाद दिला नाही तर ते स्वतःच बदलतात. नौकषाय हे कषायचे मूळ आहे. आजपर्यंत तुम्ही कषायवर काम करू शकला नाही कारण तुम्ही नौकषायवर काम केले नाही. नौकषायच कषायचा मास्टर माईंड आहे. लाईक, डिसलाईक नाही केले तर यावर काम होऊ शकते. जे आहे ते स्विकारा. टेस्टचे गुलाम बनू नका, टेस्टचे मालक बना. कर्माने तुम्हाला बांधलय की तुम्ही कर्माला बांधलय? याचे उत्तर शोधा. खरं तर दोन्हीही सत्य आहे. तुम्ही कर्माचाही क्षय करू शकता आणि आत्माही जागृत करू शकता. आत्मा जागृत केला तरी कर्म क्षय नक्की होतो. दोन्ही पैकी एक गोष्ट केली तरी मोक्षप्राप्ती होते. देव गुरू धर्माला लाईक करा, सत्ता, संपत्ती, संसाराला डिसलाईक करा. मी फक्त माझ्या गुरूला, परमात्म्याला, धर्माला लाईक करतो.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# नगरमध्ये प्रथमच २९ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळा

## जय्यत तयारी सुरू; विविध समित्यांची निर्मिती; शिवराज्याभिषेक सोहळा ठरणार कथेचे खास आकर्षण

नगर – येथील श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या वतीने शहरात प्रथमच श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स मध्ये २९ सप्टेंबर ला दुपारी ३ वाजता या सोहळ्याचा शुभारंभ राजेशाही थाटात केला जाईल. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महासचिव श्री स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून हा कथा सोहळा साकारेल. सोहळ्याच्या उत्तम नियोजनासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली असून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मनियार यांनी दिली.

ते म्हणाले, २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत कथा सोहळा चालेल. ३ ऑक्टोबरला सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत कथा होऊन सांगता केली जाईल.

२९ सप्टेंबरला पहिल्या दिवशी शिवजन्म पूर्व काळ, तत्कालीन परिस्थिती, शिवजन्म ते स्वराज्याची शपथ, संतकार्य.

३० सप्टेंबरला दुसऱ्या दिवशी कान्होजी जेधे, जावळीचा वेढा, प्रतापगड युद्धनिती, अफझलखान वध, १ ऑक्टोबरला तिसऱ्या दिवशी पावनखिंडीतील शौर्य, चाकणचा रणसंग्राम, लाल महालावर स्वारी (शाहिस्तेखानावर मात), प्रथम आरमार स्वारी, पुरंदरचा वेढा व तह.

२ ऑक्टोबरला चौथ्या दिवशी आग्रा येथून सुटका, छत्रसाल बुंदेला यांना प्रेरणा, सिंहगड अर्थात तानाजी मालुसरे शौर्यगाथा.

३ ऑक्टोबरला पाचव्या दिवशी महाराजांचे विजय पर्व, शिवराज्याभिषेक, स्वराज्याची स्थापना, भारतव्यापी हिंदवी साम्राज्य अशा पद्धतीने कथा निरुपण होईल.



श्री स्वामी गोविंददेव गिरीजी

या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष नंदनवन उद्योग समुहाचे संजय जाधव हे आहेत. ३ ऑक्टोबरला होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्याचे यजमानपद सुमित संतोष वर्मा हे भूषविणार आहेत. वैदिक पद्धतीने होणारा शिवराज्याभिषेक सोहळा या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरेल.

सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी संपर्क आणि समन्वय, मंडप आणि मंच व्यवस्था, आरती व्यवस्था, निमंत्रण पत्रिका वितरण, प्रचार–प्रसार, राज्याभिषेक उत्सव आदी समित्यांचे संघटन करण्यात आले आहे. शिवशाहीच्या इतिहासात योगदान दिलेल्या अहिल्यानगर शहरात प्रथमच श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास युवा पिढीने जाणून घेणे आजच्या काळात अत्यावश्यक आहे, म्हणून या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नगरकरांनी विशेषतः युवकांनी दररोजच्या कथा निरूपणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनलाल पटेल, विश्वस्त पुरुषोत्तम पटेल, सुभाष जग्गी, श्रीगोपाल धूत, डॉ. विजय भंडारी, मधुसूदन सारडा, रवींद्र गुजराथी, शरद झंवर, हर्षल शहा, रामेश्वर बिहाणी, विजय पंजाबी तसेच निमंत्रित कार्यकारिणी मंडळ सदस्य हिरालाल पटेल, पुरुषोत्तम नावंदर, विपुल शहा, बजरंग दरक, नितीन मंत्री, राहुल जामगांवकर, राजेश डागा, बालकिसन जाखोटिया, भगवान फुलसौंदर, सोमनाथ नजान, हर्षा गुजराथी, सल्लागार ॲड. शरद पलोड आणि डॉ. शरद कोलते यांनी केले आहे.

# शेअर ट्रेडिंगमध्ये नफा मिळवून देण्याच्या आमिषाने अहिल्यानगरमधील सीएची १५ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक

नगर – शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतुन चांगला परतावा मिळवुन देण्याचे आमिष दाखवून एका सनदी लेखापालची (सीए) तब्बल १५ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय ज्ञानेश्वर दारकुंडे (वय ३०, रा. पारगाव भातोडी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे सावेडी येथे व्यवसाय करतात. त्यांचा मित्र विशाल सासवडे याने त्यांची ओळख अनिकेत संजय वाघमारे (वय २५, रा.महेशनगर, बाराबाभळी, ता.नगर) याच्याशी करून दिली होती. आरोपी अनिकेत हा शेअर मार्केटमध्ये काम करत असून, त्याचे वडील पोलीस खात्यात असल्याचे सांगून त्याने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत अनिकेतने वैयक्तिक अडचणीचे कारण सांगून आणि नोटरी करून घेत फिर्यादीकडून रोख ६ लाख २५ हजार रुपये घेतले. त्यानंतर पैसे परत न करता, शेअर मार्केटचे खाते फ्रीझ झाल्याचे व ते अन–फ्रीझ करण्यासाठी पैशांची गरज असल्याचे सांगून फेब्रुवारी २०२४ मध्ये बँक खात्याद्वारे आणखी ९ लाख रुपये उकळले. फिर्यादीने वारंवार पैशांची मागणी केली असता आरोपी आणि त्याच्या वडिलांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच दिलेले चेक बँकेत भरले असता ते बाऊन्स झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी अक्षय दारकुंडे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. याप्रकरणी अनिकेत संजय वाघमारे विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.



दि अंबिका महिला सहकारी बँकेस महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लि., मुंबई यांचा महाराष्ट्र राज्यातील महिला बँक गटातून 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' छत्रपती संभाजीनगर येथील फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रविण दरेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# दि अंबिका महिला सहकारी बँकेस 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार – २०२६' प्राप्त


नगर – दि अंबिका महिला सहकारी बँकेस बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लि., मुंबई यांचा महाराष्ट्र राज्यातील महिला बँक गटातून 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' छत्रपती संभाजीनगर येथील फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रविण दरेकर यांच्या हस्ते आणि फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्षा सौ. वैशाली आवाडे, फेडरेशनचे संचालक ॲड. अशोक शेळके, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता भिमराज मोरे, उपाध्यक्षा सौ. सुमन गणेश गोसावी, संस्थापिका प्रा. मेधाताई काळे व संचालिका मंडळ यांनी स्विकारला. या प्रसंगी विविध बँकांचे ३०० हून अधिक बँक प्रतिनिधी उपस्थित होते. अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सौ. शांता मोरे यांनी दिली.

पुरस्काराला उत्तर देताना बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की, बँकेचा एकूण व्यवसाय रू. २३५ कोटीहून अधिक आहे. सी आर ए आर. २१.०१%, नक्त एन.पी.ए. ०.०%, नियमित लेखापरिक्षण वर्ग अ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे Eligibility Criteria for Business Authorisation सर्व निकष पूर्ण करत आहे. सभासदांना मागील अनेक वर्ष १३% लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव महिला बँक आहे. बँकेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, यु.पी.आय., ए.टी.एम. व अन्य डिजिटल सेवा सुरू केलेली आहे. ठेवी वरील व्याजदर ३६६ दिवसांसाठी ८% करण्यात आला असून कर्जावरील व्याजदर संतुलित केलेले आहे. बँकेस सर्वोत्कृष्ठ बँक पुरस्कार २०२६ प्राप्त झाल्याने आमचा आनंद द्विगुणित झालेला आहे.

बँकेच्या नावलौकिक व प्रगतीमध्ये उपाध्यक्षा मुख्याध्यापिका सौ. सुमन गोसावी, संस्थापक संचालिका, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षा प्रा. डॉ. सौ. संध्या जाधव, सौ. आशा मिस्किन, ॲड. सौ. शारदा लगड, सौ. भारती आठरे, सौ. सरोजिनी चव्हाण, सौ. शोभना चव्हाण, सौ. शोभा खरपुडे, ॲड. सौ. विजया काकडे, तज्ञ संचालक सी.ए. ज्ञानेश्वर काळे, सेवक संचालक सुभाष म्हस्के, निलेश जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड, कर्मचारी वृंद यांचे प्रामाणिक व निष्ठेचे समर्पण आहे. या प्रसंगी बँकेच्या नुतन संचालिका सौ. शिल्पा वाघ, प्रा. सौ. वैशाली मरकड उपस्थित होत्या.

# अहिल्यानगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रवेशाचा मार्ग मोकळा

## १०० जागांच्या प्रवेशाला परवानगी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचा शासन निर्णय जारी



नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सुरू होणाऱ्या अहिल्यानगरच्या पहिल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगीपत्र देण्याबाबत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दाखल करण्यात आलेले दुसरे अपील मान्य केले आहे. तसेच राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत अवगत करण्यात आले आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने १६ सप्टेंबर रोजी शासन निर्णय जारी करून ही परवानगी दिली आहे.

या निर्णयामुळे अहिल्यानगरमध्ये शासकीय वैद्यकीय शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली जाणार असून, यंदाच १०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रक्रियेत महाविद्यालयामार्फत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडे दुसरे अपील दाखल करण्यात आले होते. या अपीलावर दुसऱ्या अपील समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुपालनार्थ केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अपील मान्य केले आहे.

मंत्रालयाच्या निर्णयानुसार, २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी अहिल्यानगर येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी दरवर्षी १०० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ठेवून परवानगीपत्र देण्याची प्रक्रिया पुढे नेण्यात आली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने याबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला अवगत केले आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला महत्त्वपूर्ण गती मिळाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू होणे हे वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी स्थानिक पातळीवर एक महत्त्वाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यासोबतच वैद्यकीय उपचारांच्या सुविधांमध्येही वाढ होण्याची अपेक्षा आहे. अत्याधुनिक वैद्यकीय उपचार माफक दरात उपलब्ध होण्यास मदत होऊन त्याचा सर्वसामान्य नागरिकांना फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश लांब यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

### खा.निलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश

खा. निलेश लंके हे खासदार झाल्यापासून सातत्याने या शासकीय महाविद्यालयासाठी पाठपुरावा करत आहेत. राज्य शासन, केंद्र शासन स्तरावर केलेल्या पाठपुराव्यामुळे अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्नित ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास यापूर्वी परवानगी देण्यात आली होती.आता या ठिकाणी या वर्षी पासून १०० विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळणार आहे.

# 'स्व. भास्करराव गलांडे पाटील स्मृती' वक्तृत्व स्पर्धेचे १९ सप्टेंबरला आयोजन

अशोकनगर – अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने श्रीरामपूर तालुक्याचे माजी आमदार स्व.भास्करराव गलांडे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या शाहू महाराज सभागृहात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याच दिवशी दुपारी ३ वाजता होणार आहे.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे हे उपस्थित राहणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश गलांडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कोंडीराम उंडे हे राहणार आहेत, अशी माहिती स्पर्धा संयोजक प्रा.दिलीप खंडागळे यांनी दिली.

स्पर्धेसाठी 'अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन', 'युवकांपुढील आव्हाने', 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे युग', 'शाश्वत विकास आणि पर्यावरण', 'जागर स्त्री शक्तीचा, सन्मान स्त्री शक्तीचा' आणि 'सोशल मीडिया : शाप की वरदान?' हे विषय देण्यात आले आहेत.

सर्व महाविद्यालयांनी या वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.सुनीता गायकवाड व स्पर्धा संयोजक प्रा.दिलीप खंडागळे यांनी केले आहे.



## राजस्थानी शैलीतील गुलाबी दगडातील संगमरवरी मंदिर साकारले

सातभाई गल्ली, अयोध्या अपार्टमेंट येथील प्रसाद नंदकुमार कांबळे यांनी राजस्थानी शैलीतील गुलाबी दगडातील संगमरवरी मंदिर साकारले आहे. शिल्पशैली: स्वामीनारायण मंदिरे (अक्षरधाम), राजस्थानमधील हवेली आणि संगमरवरी मंदिरांमध्ये दिसणारे नक्षीदार खांब, तोरण आणि झुंबरदार घुमट साकारले आहे. गर्भगृहात मध्यभागी भगवान श्रीकृष्णांची बासरी वाजवतानाची श्रीकृष्ण प्रतिमा दाखवली आहे. आकर्षक घरगुती गणपती सजावट केली आहे.

